# संपादकीय

## ''नाते - बोलणे आणि लिहिणे यांचे''

बोलणे आणि लिहिणे यांच्यातील नाते नेमके कसे ठरवायचे? असा प्रश्न विचारला तर आपण आधी बोलणे; आणि त्याचे नंतर विशिष्ट लिपीत केलेले अक्षरांकन म्हणजे लिहिणे असे उत्तर देऊन मोकळे होतो. वाक् म्हणजे वाणी. आधी वाणी; उच्चार. नंतर लेखन. स्वरांना - व्यंजनांना काही खुणांद्वारे, चिन्हांद्वारे दिलेले दृश्यरूप. चीन-जपानमध्ये तर चित्रलिपीचाच वापर होतो. चंद्र, सूर्य, पाणी, आकाश इत्यादी वस्तू दाखवणारी चित्रेच काढली जातात.

परंतु याबाबतीतही आता काही नवी मांडणी केली जात आहे. डेव्हिड ऑलसन या ब्रिटिश अभ्यासकाने भाषा, निसर्ग आणि मानव यांच्या आधुनिक आकलनामध्ये लेखनाची भूमिका काय असा विषय घेऊन, त्याबद्दल सखोल विवेचन केले आहे. त्याच्या मते निसर्ग, आणि मन या बद्दलच्या विचारांना भाषा एक प्रातिनिधिक नमुना (मॉडेल) पुरवते. लेखन म्हणजे केवळ बोललेल्या शब्दांचे लिप्यंतर - हा समज एकांगी असून लेखन म्हणजे एक बोलण्याची प्रतिकृती (मॉडेल) असे मानायला हवे.

लेखनाचा इतिहास म्हणजे लेखनामुळे आपल्या ज्ञानात्मक आकलनात पडत जाणाऱ्या परिवर्तनाचा इतिहास.

निरनिराळ्या भाषा (लेखनपद्धती) आपल्या ज्ञानविषयक जाणिवांच्या वेगवेगळ्या अंगांवर भर देतात.

बोलीभाषेच्या अनेक अंगांना आपल्या जाणिवेच्या कक्षेत आणण्याचे काम लिखित शब्दांनी केले. चिंतन, पृथक्करण आणि रचना यांना माणसाच्या कक्षेत वस्तूंना आणण्याचे काम भाषेने केले.

जे बोलले जाते आणि जे अभिप्रेत असते यातील फरक हा भाषेच्या लेखी रूपातून अधिक स्पष्ट होतो. "तू खोटे बोलू नकोस" हे खुणांद्वारे, चित्रांद्वारे, चिन्हांद्वारे कसे सांगायचे?

भाषातज्ज्ञ व्हॉर्फच्या मताचा मागोवा घेऊन असे म्हणता येईल की भाषेबद्दलच्या विचारांसाठी लेखन हे काही संकेतांचा संच पुरवते. लेखन व जाणीव, लेखन व विचार यांच्यात त्यामुळे संवाद साधता येतो. तर्कशास्त्र, वाक्चातुर्याचे सिद्धान्त, शब्दकोश आणि व्याकरण यांच्या शोधाला आणि विकासाला साक्षरतेमुळे चालना मिळाली. याचा अर्थ बोलीभाषेमध्ये व्याकरण, वाक्यरचना, तर्कशास्त्र वा अलंकारिक शैलीदारपणा नसतो असा नव्हे.

जे बोलले जाते ते सर्व जाणिवेच्या कक्षेत आणण्याचे कोणत्याही भाषेत व लिपीत सामर्थ्य नसते, असेही विधान करता येईल?

जे लिपिबद्ध अशा स्वरूपात लिहिता येत नाही ते जाणिवेच्या कक्षेत आणणेही अवघड व अशक्यप्राय ठरते. जे लिपिबद्ध लेखनातून प्रतिध्वनित होते. पूर्ण प्रतिरूप (मॉडेल) म्हणून समोर येते.

एकदा लिपिनिविष्ट प्रतिरूप आपल्या अंगवळणी पडले की त्या प्रतिरूपाशी अपरिचित असणाऱ्या माणसांशी संवाद साधणेही अवघड जाते. लिपीतील धुळाक्षरे आपल्याशी ज्या रीतीने बोलतात, त्या रीतीने ती लिपी न जाणणाऱ्या व्यक्तीशी बोलू शकत नाहीत.

शिक्षणाचा वा भाषाज्ञानाचा भर त्यामुळे ध्वनी आणि धुळाक्षर यांच्यातील नाते शोधण्यावर व मनावर बिंबवण्यावर असतो. ज्या मुलांना या दोहोंची सांगड घालणे कठिण जाते ती पुढे अभ्यासातही मागे पडतात.

वाचन शिकायचे, स्पेलिंग शिकायचे म्हणजे काय करायचे? तर ध्वनीची, बोलण्याची, आकृतिनिविष्ट, लिपिनिविष्ट आकृती (मॉडेल) काढायला शिकायचे.

कोणत्याही भाषेच्या वा वक्तव्याच्या आविष्कारात्मक व चिंतनात्मक क्षमता या परस्परांना पूरक असतात; त्या एकसारख्या नसतात. बोलणे हे प्राथमिक, लेखन हे केवळ त्याचे लिप्यंतर असे सास्यूर याने प्रतिपादन केल्यानंतर लेखन हे तर्कशुद्ध विचारांना उपकारक आहे हा पारंपरिक समज थोडा डळमळीत झाला.

बोलताना आपण काही शब्दांवर विशिष्ट पद्धतीने जोर देऊन, आवाजात चढउतार करून, शारीरिक हालचाली करून किंवा चेहऱ्यावर भावछटा दाखवून आपले म्हणणे वक्तृत्वपूर्ण शैलीत मांडू शकतो. लिहिलेल्या वाक्यात ह्या सर्व गोष्टी येतातच असे नाही.

म्हणजेच बोलण्याला लिपिबद्ध करताना काही गोष्टी गमावल्या जातात; आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी काही क्लृप्त्या वापराव्या लागतात. लिखित संहितेच्या वक्तृत्वपूर्ण पैलूंना आकलन कक्षेत आणण्याचा प्रयत्न म्हणजेच

वाचनाच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी मूळ बैठक तयार करणे होय.

नव्या पद्धतीने संहिता वाचू लागले की निसर्गाचेही आपले आकलन त्याला साजेशा समदर्शी पद्धतीने होते क्रमप्राप्त ठरते.


वक्तृत्वपूर्ण शैली ही त्या व्यक्तीच्या वैयक्तिक सहेतुक अशा भूमिकेच्या प्रतिपादनविषयक गरजांतून आविष्कृत होते; तेव्हा त्यासंहितेचे वाचन करताना आपण वाचक म्हणून त्या संहितेला कशा प्रकारे समजून घ्यावे - या बद्दलही काही दृष्टिकोन आवश्यक ठरतो.

डॉ. डेव्हिड ऑलसन यांनी वाचन, भाषा, लिपी आणि वाणी यांच्या संदर्भात मांडलेली ही सूत्रे आपल्या विचारांना चालना देतील. बोलणे आणि लिहिणे या दोन बाबींमधील नात्याचे अनेक पैलू त्यामुळे ध्यानात येतील.

एखाद्याला लिहिता वाचता येते असे म्हणतो तेव्हा त्याला काय वाचता येते हेही लक्षात घ्यायला हवे. वाचन हे सहेतुक असते; वाचनक्रियेमुळे जे समजते तेही वाचकाच्या आकलनाच्या पातळीवर अवलंबून असते. अधिक ज्ञान व व्यासंग, बहुश्रुतपणा असणाऱ्या वाचकाला एखाद्या संहितेतून अधिक सखोल आशयापर्यंत पोचता येईल; तेच नवशिक्याला त्या संहितेतील अनेक बाबींचा अर्थही नीट लागणार नाही. वाचन हे एका परीने संहितेच्या श्रोतृवर्ग-प्रणीत उद्दिष्टाचे पुनर्संपादन व विस्तारीकरण असते.

लेखनाचे जे तंत्र माणसाला उपलब्ध झाले आहे ते मानवाच्या बौद्धिक व स्मरणात्मक ज्ञानसंपादनाला प्रदीर्घ टिकाऊ बैठक देणारे आहे. आपली जगाबद्दलची आधुनिक संकल्पना आणि आपल्या स्वत:बद्दलची आधुनिक संकल्पना म्हणजे कागद आणि त्यावरच्या चिन्हांकित लेखनाचे आनुषंगिक निर्मिती होय; असेही विधान डेव्हिड ऑलसन यांनी केले आहे.

वाचन-लेखन या गोष्टी आपण नित्य परिचयाच्या मानून त्या गृहीत धरून चालतो. त्या क्रियांचे नेमके स्वरूप उलगडण्याचा अशा प्रकारचा प्रयत्न त्यामुळे विशेष लक्षवेधक ठरतो.



- संपादक

# साहित्य वार्ता

## दुर्गा भागवत यांच्या हिन्दी ऋतुचक्राचे पुण्यात प्रकाशन

श्रीमती दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र' या पुस्तकाचा हिन्दी अनुवाद श्रीमती वासंतिका पुणतांबेकर यांनी केला असून त्याचा प्रकाशन समारंभ पुणे येथे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. मा. बाचल यांच्या हस्ते एका अनौपचारिक समारंभात पार पडला.

या पुस्तकास दिल्लीच्या के. के. बिर्ला फाऊंडेशनचे प्रकाशन अनुदान मिळाले असून दिल्लीच्या हिन्दी बुक सेंटरने ते प्रसिद्ध केले आहे.

---

## बारामतीला अत्रे जन्मशताब्दी सोहळा संपन्न

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे आचार्य अत्रे यांचा जन्मशताब्दी सोहळा भव्य प्रमाणावर साजरा करण्यात आला. यानिमित्त दोन दिवसांचे 'अत्रे – साहित्यदर्शन' चर्चासत्र आयोजिले होते. पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्राचार्य विजय कसबेकर यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठ मराठी विभाग प्रमुख डॉ. नागनाथ कोतापल्ले होते. या चर्चासत्रात वि. भा. देशपांडे, डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ. शशिकांत देशपांडे, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, प्रा. सीमा गोसावी, डॉ. भास्कर शेळके आदींनी अत्र्यांच्या विविध साहित्यावर निबंधवाचन केले. चर्चासत्राचा समारोप डॉ. एस. एस. भोसले यांनी केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोजकुमार गांधी यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. चर्चासत्र व सोहळ्याचे संयोजन कार्याध्यक्ष प्रा. सीताराम गोसावी व मराठी विभाग प्रमुख प्रा. धनंजय शहा यांनी केले. याप्रसंगी अत्रे यांच्या समग्र साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले. या सोहळ्यास बारामती–सासवड परिसरातील साहित्यरसिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

---

## मराठी भाषेच्या उन्नतीसाठी मानसिकता बदलण्याची गरज – वसंत बापट

साहित्य कलायात्री आयोजित पाचव्या उपनगर साहित्य संमेलनाचे उद्घाटन दैनिक सकाळचे संपादक विजय कुवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार उपस्थित होते.

मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल चर्चा परिसंवाद वा ठराव यापेक्षा मराठी भाषिकांची एक सनद आपण तयार करू. मराठी भाषेबद्दलच्या आपल्या सर्व मागण्यांचा या सनदेमध्ये



समावेश करून सर्व भाषाप्रेमीं, भाषाभिमानी व विचारवंतांनी या सनदेचा पाठपुरावा करायला हवा. या मागण्यांचा पाठपुरावा शासनदरबारीच नव्हे तर समाजातही त्यांचा प्रामाणिक आग्रह धरला जाईल, याचा कृतनिश्चय करायला हवा. शिक्षण, शासन, लोकव्यवहार, माहिती आणि मनोरंजन या सर्व क्षेत्रात गळचेपी थांबली पाहिजे. महाराष्ट्राच्या राजधानीत मराठीकडे संपूर्ण दुर्लक्ष आहे आणि खुद्द मराठी भाषिकच त्याबाबत अनाग्रही व बेफिकीर आहेत. मातृभाषेला शिक्षणात असलेले अत्यंत गौण स्थान हाच मराठीच्या दुरवस्थेचा आरंभबिंदू आहे, असे मत प्रा. बापट यांनी व्यक्त केले.

जीवनाचे दर्शन घडवणे हेच साहित्याचे खरे काम आहे. संपन्न मनांचे दर्शन घडवणारे आणि जीवनाचा खरा अर्थ ज्यातून समजते ते खरे साहित्य. त्यादृष्टीने रसिकांची अभिरुची वाढण्यासाठी अशाप्रकारची उपनगरी संमेलने आवश्यकच आहेत असे मत प्रा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

मराठी भाषेमध्ये शिकणे हे प्रतिष्ठेचे वाटत नाही तोवर मराठी भाषेला प्रतिष्ठा लाभणार नाही. सारा समाजच संवेदनशून्य, बधिर, निष्क्रिय होत असताना वाचनाची गोडी लावण्याचे व त्याद्वारे संवेदनशीलता, सक्रियता वाढविण्याचे प्रयत्न करायला हवेत, असे मत श्री. कुवळेकर यांनी व्यक्त केले. साहित्य कलायात्रीच्या वतीने राज्य पुरस्कार विजेत्या साहित्यिकांचा प्रा. बापट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रायोजकांच्या वतीने आनंद पंढरपूरे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष मंगेश तेंडुलकर यांनी प्रास्ताविक व स्वागताध्यक्ष रवींद्र भट यांनी स्वागत केले. प्रा. मिरासदार यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

---

## बापूसाहेब जोशी यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार

पुणे विद्यापीठाचे नामदेव अध्यासन व चैतन्य प्रतिष्ठान यांच्यातर्फे 'प्रसाद' मासिकाचे संपादक मनोहर यशवंत तथा बापूसाहेब जोशी यांचा 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. त्याप्रमाणे विज्ञान, अंतराळ आणि अणुयुगातही संतांचे कार्य व विचार समाजाला दिशादर्शक आहेत; म्हणूनच संतसाहित्यावर होणाऱ्या टीकेत तथ्य नसून तो केवळ वैचारिक दारिद्र्याचा गवगवा आहे, असे मत प्राचार्य राम शेवाळकर यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना बापूसाहेब जोशी म्हणाले की, व्यावसायिक यश हे रुपयांमध्ये न मोजण्याचे धोरण स्वीकारून समाजाला काय देता येईल, यावर लक्ष केंद्रित केले म्हणूनच 'प्रसाद'च्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत समाजातील सद्भावनेची प्रचीती आली. समर्थ रामदासांचे सार्थ वाङ्मय, संस्कृतमधील निवडक ग्रंथांचे मराठीत भाषांतर, आदी उपक्रम हाती घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## साहित्यातील समरसता

समाज परिवर्तनात साहित्याचा खूप मोलाचा वाटा असतो. त्या त्या काळातील साहित्य हे त्या काळातील समाज व समाजपरिस्थितीचे प्रातिनिधिक दर्शनच घडवत असते. शिवाय योग्य-अयोग्याच्या बाबतीतही मार्गदर्शक म्हणून साहित्य मोलाची कामगिरी बजावत असते, असे मत दलित साहित्य व समरसता या विषयावरील परिचर्चेत प्रकट करण्यात आले.

या परिचर्चेत सुप्रसिद्ध लेखक आनंद यादव, सत्यदेव शिंदे, नामदेव कांबळे, प्रा. तोरो, प्रा. शामराव अत्रे, रमेश पतंगे, प्रा. रमेश महाजन, विजयराव कापरे, प्रा. अनिरुद्ध देशपांडे इत्यादी मान्यवर लेखकांकडून संलग्न विषयावर निबंध मागविलेले होते. यामध्ये प्राचीन साहित्य व सामाजिक समरसता या विषयावर श्रीराम परांजपे, संतवाङ्मय आणि समरसता यावर प्रा. रमेश महाजन, साठोत्तरी दलित साहित्यातील विद्रोहाचे आकलन यावर नामदेव चं. कांबळे, प्रा. सुवर्णा रावळ व उत्तम बंडू तुपे यांनी लेख पाठविले होते. तसेच संतवाङ्मय आणि समरसता यावर डॉ. हे. वि. इनामदार यांचा लेख आला होता.

या परिचर्चेत नामदेव कांबळे यांनी दलित साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. दलित साहित्याचे वास्तव स्वरूप, दलित साहित्यातील विद्रोहामागे असणारी अस्तित्ववादाची वेदना, दलित साहित्यिकांचे असंघटित, विस्कळीत स्वरूप, मी आणि माझे सामाजिक स्थान, समाजासाठी माझे दायित्व या प्रश्नांची उत्तरे दलित साहित्यिकांना मिळाली, तर समाज एकसंध होण्यास, देशाची उन्नती होण्यास मदत होईल. दलित साहित्य हे सांस्कृतिक अस्मितेचा शोध घेणारी व्यक्तिविशिष्ट चळवळ आहे. दलित समाजधारणेतून ते निर्माण झाले, तरच त्याचे भविष्य उज्ज्वल आहे, नाहीतर खुंटलेल्या रोपट्यांसारखी दलित साहित्याची परिस्थिती होईल अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

## इस्लामपूर येथे पहिले ग्रामीण साहित्य संमेलन

समाजाचे मन शेतकऱ्यांविषयी बधिर झाले आहे. ही बधिरता दूर करण्याचे काम लेखकांनी करावे, असे आवाहन शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी केले.

वाळवा पंचायत समितीच्या आवारात शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या पहिल्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांचा रघुनाथराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री जोशी म्हणाले, ''शेतकरी व समाज यामध्ये भिंत निर्माण झाली आहे, ती लेखकांनी दूर करावी. शेतकरी लिहिण्या-वाचण्यात कच्चा आहे. तो निर्मिती करतो; पण त्याच्या कामात साहित्यिकांना अभिप्रेत असणारी नवनवीनता नाही. साहित्यात शेतकरी सोंगाड्या, विदूषक म्हणून चित्रित करण्यात येतो. व्यक्तिचित्राऐवजी व्यंगचित्रेच सादर केली जातात. आदिवासी शेतमजूर चळवळीचे चित्रण कलाव्यवहारात आहे; पण शेतकरी दुर्लक्षितच आहे. शहरे व खेड्यांत निर्माण झालेली बधिरता दूर करण्याची गरज आहे.''

डॉ. आनंद यादव म्हणाले, ''ग्रामीण साहित्य चळवळीने कृषिकेंद्रित समाजाची कोंडी लेखनाद्वारे मांडताना प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढा दिला. लेखकास प्रवाहाचे साक्षीदार म्हणून वावरावे लागते. साहित्य क्षेत्रात लोकशाहीप्रमाणे विचार चालत नाहीत. लेखकास अनुभव, आविष्कार यांचे स्वातंत्र्य असावे लागते.''

''साहित्यिकास दृष्टिकोन नसतो, दृष्टी असते. ग्रामीण लेखकांनी पूर्वसुरींचे नेतृत्व न स्वीकारता नव्या दृष्टीने काम करण्याचा प्रयत्न केला.''

संमेलनाध्यक्ष भास्कर चंदनशिव म्हणाले, ''शेतकरी संघटनेने सांस्कृतिक संघर्षाची जाणीव करून दिली. संवेदना संरक्षित केली. संवेदना मारण्याचे काम सुरू असताना शेतकरी चळवळीमुळे नवे दृष्टिकोन, संवेदना, जाणिवा निर्माण झाल्या.''

यावेळी प्रा. रा. रं. बोराडे, वाघ, वासुदेव मुलाटे, इंद्रजित भालेराव, अरविंद कुलकर्णी, डॉ. मानवेंद्र काचोळे आदी मान्यवर उपस्थित होते. सप्टेंबर १९९९ मध्ये परभणी येथे दुसरे ग्रामीण साहित्य संमेलन होईल, असे निमंत्रक शेषराव मोहिते यांनी या वेळी जाहीर केले.

## भटक्या विमुक्त जाती-जमातींचे साहित्य संमेलन

नाशिक येथील महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त जाती-जमाती शिक्षण, विकास व संशोधन संस्थेतर्फे दि. ७ जूनला नाशिक येथे एकदिवसीय राज्यस्तरीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'भटक्या समाजाचे साहित्य व संस्कृती' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात लक्ष्मण माने, मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, सौ. जनाबाई गिऱ्हे, लक्ष्मण गायकवाड, रामनाथ चव्हाण, आसाराम जाधव, डॉ. किशोर शांताबाई काळे, डॉ. भीमराव गस्ती, जी. जी. चव्हाण, दादासाहेब मोरे, पार्थ पोळके, शांताराम पंदेरे, महेश मुळे, प्रा. जव्हार राठोड, रमेश श्रीखंडे, डॉ. नागनाथ कदम, गौरवकुमार आठवले आदी मान्यवर सहभागी झाले होते. प्रसिद्ध दलित साहित्यिक बाबुराव बागुल अध्यक्षस्थानी होते.

संमेलनाचे उद्घाटन 'सकाळ'चे संपादक उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले. समारोप समारंभ ग्रामविकास व रोजगार हमी राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांच्या उपस्थितीत झाला. अध्यक्षस्थानी गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी होते. कविसंमेलनातही अनेक कवींनी सहभाग घेतला. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश होळकर होते.

## एनिड ब्लायटन आणि अगाथा ख्रिस्ती

विख्यात बालसाहित्यकार एनिड ब्लायटन हिच्या पुस्तकांचे हक्क चोरियन या संस्थेने १ कोटी ४० लाख पौंडाना गतवर्षी विकत घेतले. वर्षात फायद्याची रक्कम ४ लाख पौंडावरून २० लाख पौंड एवढी वाढली. एनिड ब्लायटनची पुस्तके म्हणजे सोन्याची खाण आहे; परंतु त्या खाणीकडे अजून आपले फारसे लक्ष गेलेले नाही असे या कंपनीच्या एका अधिकाऱ्याचे मत आहे. 'नॉडी' या व्यक्तिरेखेवर टीव्ही धारावाहिक झाल्यावर उत्पन्नात खूप भर पडेल असे त्याला वाटते.

याच चोरियन कंपनीने आता ॲगाथा ख्रिस्तीच्या पुस्तकाच्या प्रकाशनसंस्थेतील ६४टक्के शेअर्स १ कोटी पौंडांना विकत घेतले. ही रक्कम फारच कमी आहे; आम्ही अडीच कोटी पौंड द्यायची तयारी दाखवली होती असे जे. डेव्हिड हॅरिस यांनी शेअर होल्डर्सच्या वार्षिक बैठकीत सांगितले तेव्हा सारे भागधारक चक्रावून गेले. हे ६४ टक्के शेअर्स बुकर या कंपनीकडे होते. चोरियन कंनीचे अध्यक्ष जॉन कॉनलॅन यांनी म्हटले, "ॲगाथा ख्रिस्तीच्या रहस्यकथा म्हणजे एक मोठा खजिना आहे. त्यावर भरपूर कमाई करता येईल."

---

## तुकाराम गाथा - प्रकाशनासाठी २५ लाखांचे अनुदान

संत तुकाराम गाथा प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्र शासन २५ लाख रुपये अनुदान देणार आहे अशी घोषणा उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी देहू येथे पालखी प्रस्थानसमयी दिनांक १६ जून रोजी केली.

---

## प्रभाकर नारकर - खाडिलकर पुरस्कार

महाराष्ट्र टाइम्सचे प्रतिनिधी प्रभाकर नारकर यांना मुंबई मराठी पत्रकार संघाचा यमुनाबाई खाडिलकर शोधक पत्रकारिता पुरस्कार दि. २१ जून रोजी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार १० हजार रुपयांचा आहे.

---

## कथालेखन कार्यशाळा

जयसिंगपूर येथील ग्रॅज्युएटस असोसिएशनच्या वतीने दि. २१-२२ जून रोजी कथालेखन कार्यशाळा घेण्यात आली. प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ. निर्मलकुमार फडकुले, रवींद्र ठाकूर, वैजनाथ महाजन प्रभृतींनी नवोदितांना मार्गदर्शन केले. कथावाङ्मय-सामर्थ्य आणि वैशिष्ट्ये, ललित साहित्याचे स्वरूप आणि प्रयोजन, कथा विषयाचा शोध आणि अनुभूती वगैरे विषयांवर चर्चा झाली.



## महावीर जोंधळे यांच्या जनगोतचे प्रकाशन

सुमेरू प्रकाशनतर्फे महावीर जोंधळे यांच्या 'जनगोत' या व्यक्तिलेखपर आणि श्रमिक अन्नदाते संपादित 'परहिंदच कादण्व' या पुस्तकाचे प्रकाशन सांगली रोडवरील कल्पवृक्ष गार्डनध्ये प्रा. हातकणंगलेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

---

## भा.द. खेर - नाबाद ८२

'यज्ञ', 'हसरे दुःख', 'हिरोशिमा' वगैरे चरित्रात्मक कादंबऱ्यांचे लेखक भा. द. खेर यांनी १२ जून १९९८ रोजी ८१ वर्षे पूर्ण करून ८२व्या वर्षात पदार्पण केले. यंदाचा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

---

## पुरस्कारासाठी लेखन करण्याचा मोह टाळावा - यशवंत पाठक

येवला (जि. नाशिक) येथे भरलेल्या नवोदित लेखक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना ख्यातनाम संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. यशवंत पाठक यांनी नवोदित साहित्यकारांनी पुरस्कारासाठी लेखन करायचे आहे हा समज मनातून काढून टाकायला हवा असा इशारा दिला. पुरस्कारांचे हल्ली पेव फुटले आहे; आणि पुरस्कार मिळाला म्हणून आपण मोठे लेखक होतो असे मानून काहीजण विशिष्ट पुरस्कार समोर ठेवून लेखन करतात. हे चुकीचे असून, असे लेखक एका पुस्तकाच्या लेखनानंतर निष्प्रभ ठरतात, संपतात. जे लिहिण्यासारखे आहे ते सगळे आत्मकथनात लिहून झाल्यावर मग काही नवे सुचत नाही, पण संपादक लेख मागतात म्हणून रतीब घालत राहतात आणि रतीब वाढले की दुधात घाल पाणी - अशी सवयच लागते. लेखन साधना मागे पडून केवळ धंदेवाईक लिखाण होते. अनेक पुरस्कार तर विशिष्ट वर्गासाठी वा व्यक्तींसाठी असतात; आणि मुळातच सुमार व साहित्यगुणांच्या दृष्टीने निकृष्ट असल्यामुळे अशा पुस्तकांना पुरस्कार मिळूनही काहीच महत्त्व लाभत नाही असे ते म्हणाले.

नाशिक सकाळचे संपादक उत्तम कांबळे, नाशिक देशदूतचे स्थानिक संपादक निशिकांत भालेराव यांनीही मार्गदर्शन केले. हेमंत वाले, विठ्ठल वाघ, कमलाकर देसले, प्रसाद कुलकर्णी वगैरेंनी कविसंमेलन रंगवले.

लवकरच उपलब्ध !

महाभयंकर व्याधी झालेल्या रुपाच्या
तीव्र वेदनांची, जीवघेण्या संघर्षाची कहाणी

मूळ किंमत : १७५ रुपये
सवलतीत : १४० रुपये

अणसार

मूळ गुजराथी लेखिका : वर्षा अडालजा
अनु.: अंजनी नरवणे

# ' विशेष वार्ता '

## 'अरुणाज् स्टोरी'चे प्रकाशन

ग्रंथप्रकाशन सोहळे म्हणजे वाहत्या ज्ञानगंगेत सोडलेले एक एक दीप! पण कधी कधी एखाद्या दीपाला काजळी धरलेली असते, तसा वेदनेची झालर असलेला एक ग्रंथप्रकाशन नि – वाढदिवस सोहळा नुकताच परळच्या के.ई.एम रुग्णालयाच्या चार क्रमांकाच्या विभागातील विशेष रुग्ण कक्षात पार पडला...

खरेतर त्या छोटेखानी, अनौपचारिक कार्यक्रमाला 'सोहळा' म्हणणेही उचित नव्हे! कारण सोहळ्यात सामील होणाऱ्या सर्वांच्या चित्तवृत्ती उल्हसित असतात. जिचा वाढदिवस असतो, ती व्यक्ती शतायुषी व्हावी, असे आपल्याला मनापासून वाटत असते! पण हा कार्यक्रम मात्र संमिश्र भावकल्लोळांचा होता! कारण तो पन्नासावा वाढदिवस होता एका नराधम वॉर्डबॉयच्या वासनेची शिकार बनताना मेंदूला मारहाण झाल्यामुळे गेली २५ वर्षे अर्धमृतावस्थेत के.ई.एम.मध्ये लोळागोळा होऊन पडलेल्या अरुणा शानभागचा आणि ग्रंथप्रकाशनाचे निमित्त होते ते मुक्त पत्रकार पिंकी विराणीच्या 'अरुणाज् स्टोरी' या पेंग्विन इंडियाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे! अरुणाविषयी अतीव सहानुभूती बाळगणाऱ्या पिंकीने व के.ई.एम.च्या अधिष्ठात्या डॉ. प्रज्ञा पै यांनी या अनौपचारिक प्रकाशन सोहळ्याला कुणाही वृत्तपत्र प्रतिनिधीला निमंत्रित केले नव्हते. छायाचित्रकारांना तर बंदीच होती. पिंकी विराणीने आपल्या या पुस्तकाचे निम्मे स्वामित्वधन अरुणाच्या आमरण निगराणीसाठी के.ई.एमलाच दिलेले आहे.

नोव्हेंबर १९७३ मध्ये एका डॉक्टरशी वाङ्निश्चय झाला असतानाच एका नराधम वॉर्डबॉयच्या वैषयिक हल्ल्याने आयुष्यातले सर्व सुख हिरावलेली अरुणा आता २५ वर्षानंतरही अर्धवट भानावस्थेतदेखील शरीरस्पर्शाला तितकीच घाबरते नि भिऊन ओरडू लागते. केवळ सहकारी परिचारिका प्रेमाने शुश्रूषा करतात, तिला खास कपडे शिवतात, तिची सर्व प्रकारे काळजी घेतात म्हणून अरुणा जिवंत आहे. तिला आयुष्यातून उठवणारा तो वॉर्डबॉय सहा वर्षांची कैद भोगून परागंदा झाला आहे. आज तिची अवस्था शब्दही न उच्चारु शकणाऱ्या, चार–पाच महिन्यांच्या अबोध बालकासारखी आहे. कुलूपबंद खोलीत तिच्या परिचारिका–मैत्रिणी दिवसभर तिला आवडणाऱ्या जुन्या हिंदी गाण्यांच्या कॅसेटस् लावून ठेवतात.

–अशी ही अरुणाची कहाणी! एकीकडे माणसातील अमानुषतेचा तर दुसरीकडे सहकाऱ्यांमधील माणुसकीचा प्रत्यय देणारी! 'असा प्रसंग वैऱ्यावरही येऊ नये' एवढी एकच भावना साऱ्यांच्या जड अंत:करणात निर्माण करणारी!

*–(नीला उपाध्ये, महाराष्ट्र टाइम्स वरुन)*

# श्रद्धांजली

## गो. नी. दांडेकर

मराठी साहित्याच्या क्षेत्रात विविधांगी साहित्यकृतींनी मोलाची भर घालणारे ज्येष्ठ साहित्यिक गोपाल नीलकंठ दांडेकर यांचे १ जून ९८ रोजी दीर्घकालीन आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते.

आपले राष्ट्रप्रेम, दुर्गप्रेम, भ्रमंती, छायाचित्रकला असे अनेक छंद जपत त्यांनी सतत एक्केचाळीस वर्षे आपल्या असामान्य कौशल्याच्या आधारावर लेखनकार्यालाच वाहून घेतले. गेली पन्नास वर्षे गोनीदांनी निसर्ग, डोंगर आणि नदीभ्रमणातून लोकसंस्कृतीचे दर्शन घेतले आणि आपल्या साहित्यातून संस्कारमय साहित्याचे प्रगल्भ दर्शन घडवले. १९४५ साली गोनीदांनी 'आमचे धर्मगुरू' पुस्तक लिहून लिखाणाला प्रारंभ केला. १९४७ साली त्यांनी पाहिली कादंबरी 'बिंदूची कथा' लिहिली. त्यांनी सुमारे ३१ कादंबऱ्या, १२ धार्मिक अध्यात्मिक ग्रंथ लिहिले. शिवाय ललित लेख, प्रवास वर्णन, नाटक, कथा, चित्रपट कथा यांचा समावेश आहे. त्यांच्या 'स्मरणगाथेला' साहित्य अकादमी पुरस्कार लाभला होता. महाराष्ट्र शासनाचे अनेक पुरस्कार त्यांना लाभले होते. नर्मदेच्या काठावरून संपूर्ण प्रदक्षिणा केलेला, आसेतु हिमाचल भटकलेला, डोंगरावरूनच संपूर्ण आयुष्य चितारणारा योगीपुरुष असे त्यांचे यथार्थ वर्णन करता येईल. अनेक मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

**मुख्यमंत्री मनोहर जोशी** यांनी साऱ्या मराठी जनतेला भरातीय संस्कृतीचे मनोज्ञ दर्शन घडविणारा सव्यसाची, सात्त्विक साहित्यिक हरपला आहे, या शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

**मंगेश पाडगावकर** यांनी आपल्या शोकसंदेशात महाराष्ट्राच्या मातीवर आणि येथील ग्रामीण जनतेवर प्रेम करणारा प्रतिभावान कथालेखक आणि कादंबरीकार आज आपल्यातून निघून गेल्याचे म्हटले आहे. कीर्तन परंपरेचा वारसा जपणारे व वाणीत प्रसादगुण असलेल्या गो. नी. दां.नी केवळ साहित्यावर प्रेम करून जगता येते, हे सिद्ध केले होते.

**सुधीर फडके** यांनी गो.नी.दांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करताना अतिशय विद्वान साहित्यिक व माझा अगदी जवळचा मित्र काळाच्या पडद्याआड गेल्याचे म्हटले आहे. त्यांनी वाङ्मयामध्ये निर्माण केलेले स्वत:चे स्थान इतर कुणीही स्पर्शू शकणार नाही.



## रमेश मंत्री

सुप्रसिद्ध विनोदी साहित्यिक आणि कोल्हापूर येथे भरलेल्या ६५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रमेश मंत्री यांचे दि. १८ जून रोजी रात्रौ पावणेदहा वाजता निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. गेली चार वर्षे हे पक्षाघाताने अंथरूणाला खिळून होते आणि त्यांचे बोलणे थांबलेले होते.

रमेश मंत्री हे मूळचे कोकणातील झाराप येथील. सहा जानेवारी १९२२ हा त्यांचा जन्मदिवस. त्यांचे मूळ आडनाव कुळकर. परंतु ते दत्तक गेले आणि मंत्री झाले. कोल्हापूरला एम. ए. पदवी घेऊन ते पत्रकारितेत शिरले. 'सकाळ' वगैरे वृत्तपत्रांचे बातमीदार म्हणून प्रथम काम केले. पुढे ते इंग्लंडला पत्रकारितेच्या अभ्यासासाठी गेले. त्या अनुभवावर 'थंडीचे दिवस' वगैरे प्रवासवृत्तान्तपत्र पुस्तके त्यांनी लिहिली. पुढे ते अमेरिकन माहितीखात्याच्या मुंबई कार्यालयात संपादक म्हणून काम करू लागले. अमेरिकन वार्ताहरचे काही काळ त्यांनी संपादन केले. जेम्स बाँडची खिल्ली उडवणारे जनू बांडे हे पात्र त्यांनी निर्माण केले व राजकारणक्षेत्रातील आणि हेरगिरी क्षेत्रातील अनेक घटनांची त्यांनी खिल्ली उडवली. महानगर ही त्यांची कादंबरीही गाजली. विनोदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अनेक सदरे त्यांनी लिहिली. एकाच वेळी ३४ पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रमही त्यांनी केला. मराठी ग्रंथयात्रा घेऊन त्यांनी महाराष्ट्राचा दौरा केला. सुखाचे दिवस, कात्रजचा घाट, धृतराष्ट्र वगैरे त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

**अनिल मेहता** *(मेहता पब्लिशिंग हाऊस)* कोणतीही गोष्ट लपवून न ठेवणारा दिलखुलास माणूस आणि वेगळ्या प्रकारचे विनोदी लेखन करणारा साहित्यिक. अगदी नवा प्रकाशक आला तरी विन्मुख न पाठवणारा आणि नाममात्र अटी असलेला लेखक.

**ना.सं. इनामदार** *(माजी साहित्य संमेलनाध्यक्ष)* मराठी वाङ्मयाचा जबरदस्त बुरुज श्री. मंत्री यांच्या निधनाने ढासळला आहे. त्यांनी विनोदी वाङ्मयात आपले स्थान प्रस्थापित केले होते. त्यांच्या निधनाने झालेली मराठी वाङ्मयातील उणीव भरून येण्यासारखी नाही.

**साहित्यिक रवींद्र पिंगे** म्हणाले की, मंत्री उत्कृष्ट लेखक आणि हजरजबाबी व्यक्तिमत्त्व होते. त्यातील 'चांगल्या' माणसाचे दर्शनही वारंवार होत असे. जाणवत असे.

# पुस्तक परिचय




## युगप्रवर्तक फ्रेंच शिल्पकाराची मनोवेधक चरितकहाणी

## रोदँ

**शांताराम पारपिल्लेवार**

शांताराम पारपिल्लेवार यांनी फ्रेंच शिल्पकार रोदँ याच्या जीवनकहाणीला कादंबरीच्या स्वरूपात पेश करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. आपल्याकडे या चित्रकाराबद्दल फारशी माहिती नाही. ती या पुस्तकामुळे होईल. लस्ट फॉर लाइफ वाचल्यावर व्हिन्सेंट व्हॅन गॉग या चित्रकाराचे नाव आपल्याकडे सर्वांना जवळचे वाटू लागले. 'दि ॲगनी ॲंड द एकस्टसी' वाचल्यावर मायकेल एंजेलोशी आपली जानपहचान घनिष्ठ झाली. तसे रोदँबद्दल या पुस्तकामुळे प्रेम वाटायला हरकत नाही. स्वत: पारपिल्लेवार हे भारत-फ्रान्स मित्रमंडळाच्या माध्यमातून फ्रान्समध्ये जाऊन एक महिना भटकून आले. त्याबद्दल त्यांनी माणूसमध्ये पॅरिस आय लव्ह यू नावाने एक लेखमालाही लिहिली. पाश्चात्य साहित्यिकांवरही त्यांनी बरेच परिचयात्मक लेख लिहिले आहेत. रेल्वेत नोकरी करून, बल्लारशा सारख्या ठिकाणी राहूनही त्यांनी आपले लेखनवाचन जारी ठेवले. १९७५मध्ये पॅरिसहून परतताना तेथील एका मित्राने रोदँचे शिल्पप्रदर्शन दाखवले; त्याच्याबद्दलचे एक पुस्तक भेट दिले. त्या पुस्तकातून जाणवलेला 'पराभव गंड' (डिफीट कॉम्प्लेक्स) पारपिल्लेवार यांना वेटाळून गेला. खूप जीवघेण्या संघर्षातून रोदँचा कलाविष्कार झाला; त्याच्या शिल्पात एक प्रकारची भव्यता व महात्मता आढळते. या रोदँबद्दल पुढे त्यांनी एक कथा लिहिली. त्यानंतर ही कादंबरी. त्यासाठी भरपूर पुस्तके मिळवली. (त्यांची सूची शेवटी दिली आहे). तेथील स्थळांचे, जीवन शैलीचे तपशील मिळवले. ते सारे सविस्तर वापरल्याने कादंबरीची पृष्ठसंख्या, ४६० होणे अटळच म्हणावे लागेल. यूरोपमधील महत्त्वाच्या घटनाही शेवटी दिल्या आहेत. त्याच्या



आयुष्यातील जवळच्या व्यक्ती म्हणजे त्याची घटस्फोटित पत्नी कॅमिली क्लॉडेल, त्याची मैत्रीण ग्वेन जॉन, पेटिट ऑगस्ट, ज्युडिथ क्लॉडेल. यांचे पुढे काय झाले तेही थोडक्यात दिले आहे.

कॅमिली ही रोदँपासून वेगळी झाल्यावर कायम रोदँचा दुस्वास करीत राहिली. १९१३ मध्ये ती मनोरुग्णालयात दाखल झाली. १९४३ मध्ये ती मरण पावली. रोदँपासून विभक्त झाल्यावर ५० वर्षे ती जगली; ती वर्षे तिने अत्यंत दुरवस्थेत काढली. रोदँची दुसरी प्रेयसी ग्वेन जॉन ही मात्र कायम त्याच्यावर जीव टाकत राहिली. तीही एकाकी जीवन जगली. खूप मांजरे पाळून त्यांची देखभाल करण्यात तिने वेळ घालवला. समुद्राबद्दल तिला ओढ होती. १८ सप्टेंबर १९३९ रोजी ती मरण पावली. मुलगा पेटिट ऑगस्ट अविवाहित होता. रोदँच्या मृत्यूनंतर १९ वर्षांनी तो अतिरिक्त मद्यपानाने मरण पावला. रोदँचे 'थींकर' हे शिल्प क्लीव्हलँडमध्ये उभारलेले होते. १९७०मध्ये ते स्फोटक दारूने उडवण्यात आले. रोदँच्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींचीही काहीशी परवड झाली.

फ्रान्स्वा ऑगस्ट रेने रोदँचा जन्म १२ नोव्हेंबर १८४० रोजी झाला. पॅरिसमध्ये - त्याचे वडिल ज्यॉं बाप्टीस्ट रोदँ त्यावेळी ३८ वर्षाचे होते. आई मारी शेफर ३४ वर्षांची. बाप निरक्षर होता. मुलानं पोलिस इन्स्पेक्टर व्हावं हे त्याचं स्वप्न. चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी तीन वर्षांचा हा पोर संतांच्या शिल्पाकडे टक लावून पाहत राहायचा. शाळेतही तो चित्रंच जास्त काढायचा. इतर विषयांकडं दुर्लक्ष करायचा. जवळच एका चर्चचा जीर्णोद्धार चालला होता. त्याचं काम पाहत तो तासन् तास घालवायचा. शाळेत रोदँच्या वडलांना बोलावून घेण्यात येते. चार वर्षे शिकूनही त्याला बेरीज वजाबाकी येत नाही, तो शाळेत गैरहजर राहतो असे हेडमास्तर वडलांना सांगतात. हा पोरगा आपली सारी स्वप्नं धुळीला मिळवणार म्हणून बाप अस्वस्थ होतो. ऑगस्ट रोदँ चित्रकार व्हायची स्वप्नं बघतोय म्हणून बहीण मारियालाही काळजी वाटते. "चित्रकार म्हणजे भ्रष्ट - विकृत लोक." हे वडिलांचे मत मात्र तिला पटत नाही. क्लोटिल्डी ही त्याची पहिल्या बायकोपासून झालेली मुलगी. रेशमी झगा - हॅट वगैरे घालून मादाम रोझोकडे कामाला जाते. ती बाहेर काय करते या बद्दल मात्र शंकेची पाल त्याच्या मनात कुरकुरत राहते. तो मादाम रोझोचा शोध घेतो - पोरीने फसवलेय हे त्याच्या लक्षात येते.

चित्रकलेचे प्रशिक्षण देणाऱ्या पेटिट इंकोलमधील व्हिक्टर या तरुणाच्या मदतीने रोदँही तेथे प्रवेश घेतो. तेथे नवे मित्र मिळतात. पिमेर लॉसेटमकडून तो तैलरंगातील व्यक्तिचित्रे काढायला शिकतो. दुपारी लू व्ह्रच्या कलादालनात बसून चित्रे काढतो. रंग परवडत नाहीत म्हणून शिल्पकलेकडे लक्ष द्यावे असे त्याला शिक्षक सुचवतात. "शिल्पकाराचा लढा चित्रकारापेक्षा मोठा आहे" हेही ते बजावतात. पण ऑगस्टचा आत्मविश्वास वाढतो. त्याच्या

चित्रांना दोन पदके मिळतात. वडीलही मग त्याचे कौतुक करतात. तो वडलांचा अर्धपुतळा तयार करतो. वडील खूष होतात. “मी इतका का म्हातारा झालोय?” असेही म्हणतात. पण त्याला इकोल व्यो आर्ट या विद्यालयामध्ये मात्र प्रवेश नाकारला जातो. त्याच्या शिल्पात कलामूल्य नाही असे सांगण्यात येते. पेटिट इकोलमध्येच कार्पो (Carpeaux) हा नवा शिक्षक शिल्पकार येतो. तो दगडात चैतन्य ओततो.

मारिया ही बहीण त्याचवेळी आपण येशूच्या प्रेमाखातर प्रभूच्या सेवेत नन बनून आयुष्य घालवायचा मनोदय व्यक्त करते. आणि दीड वर्षातच तब्येत ढासळून तिचे देहावसान होते. ऑगस्टला वेड लागल्यासारखे होते. धर्मशास्त्राचा प्रशिक्षणार्थी म्हणून तो फादरला शरण जातो. ब्रदर आगस्टीन हे नाव त्याला मिळते. पण त्याचा शिल्पकलेकडील ओढा पाहून फादर त्याला धर्मगुरूच्या पेशातून मुक्त करतात.

नंतर रोदँ स्वत:चा स्टुडिओ काढतो. तेथे त्याच्या जीवनात रोझ ही तरुणी येते. ती त्याच्या स्टुडिओची देखभाल करते. मॉडेल बनून न्यूडस काढायला पोझेस देते. त्याच्या प्रेमात पडते. रोझ त्याला लग्नाची गळ घालते. पण तो लग्नाचा विचार पुढे ढकलत राहतो. ती गरोदर राहते. मुलगा होते. छोट्या ऑगस्टला रोदँ आपल्या आई-वडिलांकडे सोडतो. सेझाँ, क्लॉद, मोने, फ्रेदरिक ब्रॅझिल वगैरे चित्रकारांशी त्याचे स्नेहसंबंध प्रस्थापित होतात. आर्ट डीलर मॅडम डिसोमशी त्याची जान पहचान होते. रोदँची शिल्पे कॅरिये बेलूस या सहीने विकली जातात. हे कलेचं व्यापारीकरण रोदँला अस्वस्थ करते. तो ब्रुसेल्सला जातो. रॉसबर्गशी भागीदारी तोडतो. छोटा ऑगस्ट मतिमंद असल्याची शंका असल्याने रोझचे मन सैरभैर असते. त्याला सोडून रोदँबरोबर ब्रुसेल्सला जायचे तिच्या जीवावर येते.

१८७२ मध्ये रोदँचे नाक तुटलेला माणूस हे शिल्प गाजते. त्याची नंतर तब्येत बिघडते. रोझ त्याची काळजी घेते. विश्रांतीसाठी ॲमस्टरडॅमला ते जातात. रॉसबर्गची व त्याची भागीदारी परत चालू होते.

रोमला भेट देऊन रोदँ तेथील शिल्पे पाहतो. रॉसबर्ग आपल्याला लुटतोय हे लक्षात आल्यावर त्यांचे संबंध ताणले जातात. रोदँ पॅरिसला परततो. त्याला आता तेथे मान्यता मिळते.

एज ऑफ ब्रॉँझ या त्याच्या चित्राबद्दल ललितकला मंत्रालय त्याला दोन हजार फ्रँक मानधन देते. त्याला कलासंग्रहालयाचे महाद्वार करण्याचे कामही मिळते. १८८०मध्ये एज ऑफ ब्रॉँझ - हे आदिमानवाचे शिल्प सरकारी खर्चाने धातूत घडवण्यात येते. सेलॉन प्रदर्शनात ठेवलेल्या सेंट जॉन प्रीचिंग चित्रासाठी सरकार रोदँला सहा हजार फ्रँक देते. व्हिक्टर ह्युगोचे शिल्प तो घडवतो. ह्युगोबरोबर लग्नाशिवायच मॅडमोझेल ज्युलिएट राहत असते. ती त्याच्याशी एकनिष्ठ असते.



रोदँच्या जीवनात पुढे कॅमिली ही तरुणी येते. नंतर रायनर मारिया रिल्के हा कवीही त्याचा प्रिय दोस्त होतो. खूपच विस्ताराने कादंबरीत त्यांच्या स्नेहसंबंधांचा आलेख काढण्यात येतो. कलावंत व माणूस म्हणून त्यांच्या होणाऱ्या विकासाची झलक त्यातून दिसते.

एका कलावंताच्या संघर्षाची, कलासाधनेची ही कहाणी झपाटून टाकणारी आहे.

*रोदँ, पृष्ठे ४८०, दोनशे नव्वद रुपये*



**अनेक जबाबदाऱ्या असूनही**
**मी मनाने**
**आतून मुक्त आहे**

## कोलाज

**शिरीष पै**

आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. त्यानिमित्त गावोगाव अनेक कार्यक्रम झाले. अनेक चर्चासत्रे झाली. अनेक नवीन पुस्तके निघाली. त्यांच्या दोन कन्या शिरीष पै आणि मीना देशपांडे यांनाही आपल्या विख्यात पित्यावर महाराष्ट्राचे किती अलोट प्रेम होते याची पुन्हा प्रचीती आली असणार!

शिरीष पै यांनी अनेकदा आपल्या आईवडिलांवर लिहिले आहे; आणि दरवेळी काहीतरी नवेच भावबंध त्यांना सुचत राहतात. ‘कोलाज’ हा त्यांच्या स्फुट लेखांचा नवा संग्रह. त्यात ‘पपा-चैतन्याचा एक दिव्य स्त्रोत’ ‘माझी आई’, ‘माझे वडील विनोदवीर’ इ. लेख पुनश्च त्यांच्या स्मृतींना उजाळा देणारे आहेत.

‘शरॉफ हाऊसपर्यंत’ या लेखात लहानपणापासून ज्या ज्या घरात वास्तव्य झाले, त्यांची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे अत्रे परिवाराची अधिक जवळून ओळख होते.

शिरीषचा जन्म १९२९ झाला तो पुण्यातील बुधवार पेठेतल्या गोडबोले वाड्यात. त्यानंतर वर्षभरातच हुजुरपागा शाळेजवळच्या, लोखंडे तालमीसमोरच्या शिरनामे वाड्यात आचार्य अत्रे राहून लागले. सुधा अत्रे हुजुरपागा शाळेत शिक्षिका होत्या. त्यांना हा वाडा अगदी

शाळेजवळ असल्याने सोयीचा होता. आचार्य अत्रे त्यावेळी कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचे प्रमुख होते. सकाळी १०वाजता हे दोघे टांग्याने निघत.

या वाड्याची मालकी सध्या आढावांकडे आहे आणि त्यावर 'येथे आचार्य अत्रे यांचे वास्तव्य होते' अशी निळी पाटीही लावली आहे. या वाड्यातील आचार्य अत्रे यांची बैठकीची खोली शेणाने सारवलेली, निळी सतरंजी अंथरलेली, गाद्यांची बैठी बैठक असलेली सदैव हास्यविनोदाने बहरलेली असे. भेटीला येणाऱ्या लोकांशी सकाळपासूनच गप्पागोष्टींची मैफल जमे. पहाटे उठून अत्रे लेखन करीत.

एकदा छोटी शिरीष झोपलेली होती त्या खोलीकडे एक नाग सरपटत जाताना सुधाताईंना दिसला आणि त्यांनी आजूबाजूच्या बिऱ्हाडकरूंना बोलावून त्याचा चेंदामेंदा केला. एकदा टॉयलेटमध्ये शिरीष मेणबत्ती घेऊन गेला असताना तिचे केस पेटले; कपाळावर भाजल्याचे चट्टे पडले. उन्हाळ्याच्या दिवसात फुलांच्या कुंड्यांना साप विळखे घालून बसलेले दिसायचे आणि घाबरगुंडी उडायची.

शिरीष सहा वर्षांची असताना अत्रे हा वाडा सोडून सोमवार पेठेतल्या सारस्वत कॉलनीतल्या दळवी बंगल्यात राह्यला गेले. मोठे आवार, शिवाचे मंदिर, कासव आणि मासे यांनी भरलेले तळे – अशा त्या परिसरात समवयस्क मैत्रिणी शिरीषला मिळाल्या. तेथेच एक खानावळ होती. त्यातील सारस्वत जेवणाची चटक पुढे सर्वांना लागली. तेथून या कॉलनीतल्या दुभाषींच्या बंगल्यात स्थलांतर झाले. येथेच असताना आचार्य अत्रे यांना नाटककार, चित्रपटकार व नवयुग वाचनमालेचे संपादक म्हणून प्रसिद्धी मिळाली. उत्तम फर्निचर घरात आले. कोच, गालिचे, पलंग, आरसे, फोन इ. सर्व आले.

परंतु लौकरच अत्रे मुंबईला अभिनेत्री वनमालाबरोबर जास्त राहू लागले; आणि सुधाताईंना हा बंगला खायला उठल्यासारखे वाटू लागले. त्यांनी नाशिकला ट्रेनिंग कॉलेजच्या व मुलींच्या मुख्याध्यापिकेच्या पदावर बदली मिळवली. बोर्डिंगमध्ये राहण्याची वेगळीच शिस्त तेथे अंगी बाणली. अधूनमधून आचार्य अत्रे वादळासारखे येत आणि वावटळीसारखे जात. पाच वर्षे तेथे काढल्यावर सुधाताईंची बदली पुण्याला झाली. ट्रेनिंग कॉलेजच्या मुख्याध्यापिका म्हणून वास्तव्य पुन्हा बोर्डिंगमध्ये. येथे सहा वर्षे वास्तव्य झाले.

१९५१मध्ये अत्र्यांनी आपल्या दोन्ही मुलींसाठी मुंबईला कोकणनगरमध्ये दोन ब्लॉक घेतले. व्यंकटेश पै यांच्यांशी शिरीषचा विवाह होतो. दोन मुलांचा जन्म होतो. दैनिक मराठाच्या रविवार पुरवणीचे संपादन इ. कामे त्या करतात. असे धावपळीचे जीवन.

१९६३मध्ये शिरीषताईंच्या जीवनात काही आकस्मिक संकटे आली. मोठा संघर्ष झाला. नैराश्याने मन झाकोळून गेले. कोकणनगरमधले ते घर भीतिदायक भासांमुळे मन:शांती हिरावून घेणारे ठरले...



१९६६मध्ये सध्या शिरीषताई राहतात त्या 'आमोध हाऊस'मध्ये राह्यला आल्या. त्याचे आताचे नाव शरॉफ हाऊस आहे. या नव्या घरातले वास्तव्य सभासमारंभांनी व थोरामोठ्यांच्या भेटीगाठींनी गजबजत राहिले.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या मुहुर्तावर आचार्य अत्रे-सुधा अत्रे पुन्हा एकत्र राहू लागले. "पपांचे सर्व वैभव डोळे भरून पाहिले. तिच्या जीवनाचे सार्थक झाले" असे शिरीषताईंना वाटते.

"शरॉफ हाऊसमध्येच आपले सगळे महत्त्वाचे लेखन झाले; या घरात मी काहीही लिहायला बसले तर माझी लेखणी क्षणभरही अडखळत नाही. संसाराच्या जबाबदाऱ्या अशा रीतीने पार पाडणे की ते कार्य जणू तू करीत नाहीस, एक अज्ञात शक्ती तुझ्याकडून करवून घेत आहे. या सर्वांमागे हे करून घेण्यामागे तिचा काही हेतू आहे तो तू ओळख." "नि:स्वार्थी भावनेने कुटुंबातल्या सर्व घटकांसाठी त्यांचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून कर्म करता करता मला नैष्कर्म्य सिद्धीचा अर्थ कळत गेला." शिरीषताईंच्या सद्य:कालीन मन:स्थितीचा मागोवा या लेखामुळे लागतो.

खंडाळ्याच्या पपांच्या बंगल्याचाही थोडा संदर्भ येऊन जातो.

आपल्या आईबद्दल त्या लिहितात : "आयुष्यभर तिनं मला प्रेमानं जवळ असं कधी घेतलं नाही. पण तिचा हा शेवटचा स्पर्श मला फार प्रेमाचा वाटला. पपांनी तिला आयुष्यात दुखवलं. पण तिनं त्यांना सतत क्षमाच केली ह्याचा मला कधीही विसर पडत नाही. तिचे सगळे दोष माफ करून आजही जर मला कोणी विचारले की स्त्रीचा मोठेपणा कशात आहे तर मी माझ्या आईला स्मरून एकच उत्तर देईन – माझ्या आईप्रमाणे सर्वस्वी स्वत:च्या नवऱ्याची बायको होण्यात."

बाईची अब्रू, माझ्या जुन्या साड्या ... अरेरे!, चिखलातली कमळं, आवारा हूं, दैव ते येथ पाचवे, ही वेडी माणसं, विळाभोपळा किंवा कुत्रंमांजर, आनंदभाविनी सुहासिनी मुळगावकर, जून आला, दिल बहला न सके, उपवनी गात कोकिळा वगैरे छोटे लेखही या पुस्तकात आहेत. 'माझ्या कवितेचा प्रवास' हा लेखही माहितीपूर्ण आहे.

पाँडिचरीच्या श्रीमाताजी, ओशो रजनीश, जे कृष्णमूर्ती या तिघांच्या शैलीचा व विचारांचा प्रभाव सध्या शिरीषताईंना सुखद वाटतो. माताजींच्या रोजनिशीतून मधुर काव्य भरलेले आहे. त्यांचे लिहिणे बोलणे साधकाला उदात्त जीवनाकडे नेणारे आहे. रजनीशांसारखी सोपी, सुंदर, लालित्यपूर्ण हिंदी भाषा क्वचितच ऐकायला मिळे. कृष्णमूर्तींच्या जीवनभाष्यांमुळे साध्या घटनांतून आयुष्याचा परमार्थ शोधण्याची दृष्टी मिळाली असे त्या म्हणतात. त्यांच्यामुळे उघड्या डोळ्यांची जगाकडे समाजाकडे व स्वत:कडे बघण्याची दृष्टी आली.


वाचकांची सुंदर पत्रे हे लेखकाला त्यांच्या लेखनाबद्दल मिळालेले सर्वश्रेष्ठ पारितोषिक

आहे असे त्या मानतात; आणि तशी पत्रे येत असल्याने स्वत:ला त्या भाग्यवान मानतात.

'कोलाज' वाचून त्यांना पत्र लिहावेसे वाटावे असे अनेक मुद्दे वाचकांना सहज सुचतील.

*कोलाज, पृष्ठे १३६, ऐंशी रुपये*

---




**आपण स्वतःला**
**जेवढे सुखी समजती**
**तेवढेच सुखी असती**

# रंग सुखाचे

**डॉ. रमा मराठे**

माणसाच्या मनाचे कोडे कधीच उलगडत नाही. हे जग भौतिक पातळीवर काही विशिष्ट नियमांनी चालते; पण त्या जगावर सत्ता चालवणारे मन कुठल्याच नियमाच्या चौकटीत बसवता येत नाही. पुन्हा प्रत्येकाचे मन ही एक स्वतंत्र गोष्ट. ते मन, त्यावरचे संस्कार, त्याचे चंचलपण, त्याचा मूल्यविवेक, त्याच्या आशाआकांक्षा हा सारा प्रकार त्याचा त्यालाही अगम्यच राहतो असे वाटते. आपल्या मनाचा थांग आपल्यालाच लागत नाही. इतरांना तरी मग तो कसा लागणार? आपल्या सुखदु:खाचे सारे श्रेय अपश्रेय ही या मनाचीच क्रीडा आहे.

'रंग सुखाचे' या सदराद्वारे या मनाचेच एका वेगळ्या प्रकारे आकलन करून घेण्याचा प्रयत्न डॉ. रमा मराठे यांनी केला आहे.

या लेखमालेमागचे सूत्र स्पष्ट करताना लेखिकेने म्हटले आहे, "योगी, संतमहंत सांगतात त्या ज्ञानियांच्या सुखाचा रंग शुभ्रधवल, रविकिरणांसारखा! पण सर्वसामान्यांसाठी त्याच प्रखर शुभ्रतेतून सप्तरंगी इंद्रधनुष्य साकारते. सुखाचे रंग अनेक. छटा वेगवेगळ्या. माणसं आणि त्यांच्या सुखाच्या कल्पना जाणून घ्यायचं मला जणू वेडच आहे. सुखाचे मिळाले ते रंग घेऊन कुणी आपलं जगणं इतकं सुंदर बनवलं होतं की मला त्या माणसात आगळा कलाकार दिसू लागला. तर हवे ते रंग मिळूनही काहीजणांनी आपले जगणे कुरूप केले होते. सुखाचे वेगवेगळे रंग पाहून मी हरखून गेले, भारावले. रंगबावरी झाले. वाटलं, हे सुखाचे रंग जरा



आणखी जवळून पहावे... शोधता शोधता कळले, मानसशास्त्राच्या लोलकातून हे रंग नक्की पाहता येतील. तसे ते पाहिले आणि वाटले, याबद्दल बोलावे, लिहावे. त्यामुळे या सुखाच्या रंगांची आणखी ओळख होईल. जाण वाढेल. जगण्यातील एकमेकांच्या कलात्मकतेची, रसिकतेची वृद्धी होईल. कारण हा विषय सर्वस्पर्शी आणि प्रत्येकजण आपापल्या परीनं कलावंतच."

प्रथमच लेखिका वाचकाला विश्वासात घेऊन सांगते : "आपण एक संकल्प करू या. कुठला संकल्प? सुखी राहण्याचा, सुख ओळखण्याचा आणि सुख मिळवण्याचा. हा संकल्प प्रत्येकाने करायला हवा" असे ती म्हणते.

यावर वाचक विचारणार : सुख हवेय हो! पण ते मिळणार कसे? त्यासाठी सुखी माणसाचा सदरा हवा. तो कुठे आहे आमच्या भाग्यात?

–आणि लेखिका खरे सुख म्हणजे काय ते स्पष्ट करू पाहते.

सुख ही एक सवय आहे. सुखी राहणं ही एक सवय आहे. ही एक मानसिक सवय आहे. माणसाचं जीवन अनुभवणं यातच मुळी मोठं सुख आहे.

सुख ही स्थिती तात्पुरती असते. सुखाची स्थिती येते आणि जाते. खुळखुळा वाजवला की रडणारे मूल हसू लागते. सुखी समाधानी असणे ही एक प्रवृत्ती वा मानसिक सवय आहे, सुख ही गोष्ट आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनावर आणि प्रवृत्तीवर अवलंबून असते. सुखासाठी आयुष्याचा डाव लावताना खिलाडू वृत्तीने खेळण्याच्या आनंदासाठी खेळायला हवे. हारजीत महत्त्वाची नाही. खेळ महत्त्वाचा याकडे लेखिका लक्ष वेधते.

सुखी होण्यासाठी काही सूत्रे लक्षात ठेवायला हवी.

१) जीवन हे विशाल आकाश आहे, मी त्यात विहार करणारा एक पक्षी आहे.

२) मी माझ्या आयुष्याचा राजा आहे. सुख हे स्वातंत्र्य, स्वावलंबन कृतिशीलता, अधिकार यांच्याशीही संबंधित असते.

३) समस्या गृहीत धरून योजना आखा. इन्स्टंट कर्मयोगी व्हा.

४) स्नेहशील माणूस सुखी असतो.

५) आपणापैकी प्रत्येकजण हा आपले दुकान थाटून बसलेला असतो. प्रत्येकाची प्रत्येकाशी देवघेव चाललेली असते. कुठलीही वस्तू फुकट मिळत नाही. फुकट दिली जात नाही.

६) सुखाचे एक अर्थशास्त्र असते. प्रत्येक गोष्टीची योग्य किंमत जाणून घ्या व तेवढीच द्या. नुकसान थांबवा.

७) आपण स्वत:ला जेवढे सुखी समजतो तेवढेच सुखी असतो. हे अब्राहम लिंकनचे वाक्य लक्षात ठेवा. हसण्यासाठी आपला जन्म आहे असे माना.

८) स्वत:चा, इतरांचा आणि परिस्थितीचा बिनशर्त स्वीकार करण्याचं तंत्र जमलं की सुखाचे रंग सहज दिसू लागतील.

९) मन वढाय वढाय जसं पिकातलं ढोरं –

१०) काम करीत राहणारा माणूस हाच सुखी असतो.

११) अपूर्णतेतही गोडी असते.

१२) जे मिळाले जमले त्याबद्दल कृतज्ञता बाळगा.

१३) स्वीकार प्रत्येक त्रुटीचा आणि कृतज्ञता प्रत्येक असण्याची.

ही सूत्रे स्वीकारली की प्रत्येक क्षण हा सोन्यासारखा होते. सुदाम्याला कृष्णाकडे जाऊन आल्यावर आपलं घरदार सोन्याचं झालेलं दिसलं, तसं तुम्हांला वाटेल.

शेवटी लेखिका आणखीही काही सुखाचे कानमंत्र देते.

कधीही दु:खी होऊ नका, राग, संताप, चीड, मत्सर, द्वेष, दु:ख अशा नकारार्थी भावनांना स्थान देऊ नका. अशा भावना मनात आल्या तर स्वत:लाच विचारा – मी का दु:खी आहे? माझ्यातील दोषामुळे, उणिवेमुळे? दुसऱ्याच्या दोषामुळे? परिस्थितीमुळे? या न्यूनासकट, दोषासकट मी स्वत:चा, इतरांचा किंवा परिस्थितीचा स्वीकार करू शकतो का? का करू नये? मी तरी परिपूर्ण असायला हवं ना? इतरांनी परिपूर्ण असावं असा वेडा आग्रह मी का धरावा? धंदाव्यवसायात पडझड होतेच. आपल्यालाही तसा अनुभव आला तर त्यात जगावेगळे काही नाही. दु:खी, हताश, निराश होण्यासारखे काही नाही. समंजस, सहानुभूतीने, कल्पनाशक्तीने आपण जीवनात सुखाचे रंग भरू शकतो.

मनावर जेव्हा निराशेचे सावट पडू पाहते तेव्हा हे पुस्तक घ्या. कुठलेही पान उघडा आणि वाचू लागा. पुन्हा नवी उभारी येईल.

*रंग सुखाचे, पृष्ठे १०४, पासष्ट रुपये*


**गतिमान काळाच्या झंझावाती प्रवाहात वेगानं बदलत चाललेल्या स्त्री-पुरुषांमधल्या नात्यांची अत्याधुनिक कहाणी**

**डिस्क्लोजर**

**मूळ लेखक : मायकेल क्रिश्टन**
**अनु.: माधव कर्वे**

मूळ किंमत : **२२० रुपये** ■ सवलतीत : **१७५ रुपये**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६,सदाशिव पेठ पुणे. ✆ ४७६९२४
**मेहता बुक सेलर्स,** भाऊसिंगजी रोड,कोल्हापूर. ✆ ५२२३०४




**मानवजातीला नष्ट करण्याची क्षमता असलेल्या एड्स सारख्या आणखी एका विषाणूचा अवतार**

# द हॉट झोन

**अनु.: प्रमोद जोगळेकर**

द हॉट झोन म्हणजे ज्या भागात जैविक दृष्टीने प्राणघातक विषाणू आहेत असा भाग. शत्रूवर हल्ला करण्यासाठी विषाणूंचा जैविक शस्त्र म्हणून वापर करण्याची व कोणी तसा केल्यास बचाव करणारी लस शोधण्याचे काम हॉट झोन मध्ये चालते. हा लष्करात वापरला जाणारा शब्द आहे.

जैविक सुरक्षा पातळीच्या पुढच्या संसर्गजन्य अशा या प्रदेशात शिरतानाही दक्षता घ्यावी लागते. जंतुरहित अंतराळ पोशाख घालून, शरीराला स्पर्श करणाऱ्या कपडे, अंगठ्या, कॉन्टॅक्ट लेन्सेस वगैरे गोष्टी काढून ठेवून, हवाबंद दरवाजावर जंतुनाशकाचा फवारा मारूनच या झोनमध्ये प्रवेश करावा लागतो.

१९७६ ते १९९३ या कालावधीत हॉट झोनमध्ये जे नाट्य घडते, त्यावर या थरारकथेची कथावस्तू फुलवली आहे. हॉट झोन आणि बाह्यजग यांच्या दरम्यान संधिप्रकाशाप्रमाणे ग्रे झोन असतो. त्यात हॉट व बाह्यजग या दोहोंना जोडले जाते. जैविक सुरक्षा पातळी–४वर असणाऱ्या विषाणूंना प्रतिबंध करण्यासाठी उभारलेले हॉस्पिटल म्हणजे स्लॅमर; या पातळी–४वरचे शवागार म्हणजे सबमरिन, पेशीमध्ये वाढणारे स्फटिकरूपातील विषाणूचे गठ्ठे म्हणजे ब्रिक किंवा क्रिस्टलॉईड; एखाद्या यजमान शरीरात विषाणू वाढणे म्हणजे वर्धन (अँप्लिकेशन), (आगंतुक), विषाणूच्या संसर्गाने जेव्हा रुग्ण मरतो तेव्हा त्याला क्रॅश अँड ब्लीड आउट हा शब्द वापरला जातो. उष्ण कटिबंधातला घातक विषाणू एबोला आणि त्याच्या उपजाती, जैविक प्रतिबंधाची व्यवस्था केलेले खोके म्हणजे हॅट बॉक्स किंवा आइसक्रीम बॉक्स, एचआयव्ही–हा एडसचा विषाणू जैविक सुरक्षा पातळी–२वरील असून त्याचा जागतिक पातळीवर जोरदार प्रसार चालू आहे.

अशा विषाणूंद्वारे रोगप्रसाराची स्फोटक व प्रलयंकार साखळी निर्माण होणे ही एक जैविक प्रक्रिया आहे; आणि त्या साथीत अनेक लोक बळी पडतात. त्याला एक्स्प्लोझिव्ह चेन ऑफ लेथल ट्रॅन्समिशन असे म्हणतात. एन्व्हरोकेम हा हिरव्या रंगाचा द्रव निर्जंतुकीकारणासाठी वापरतात. एअरलॉक मधील शॉवरसाठी हे रसायन वापरतात. अलीकडेच उद्भवलेल्या विषाणूंना उद्देशून इमर्जिंग व्हायरसेस–नवोद्भूत विषाणू हा शब्द

वापरला जातो. या सर्व संकल्पनांची माहिती असेल तर ही कादंबरी अधिक आवाहन करील.

युनायटेड स्टेट्स आर्मी मेडिकल रिसर्च इन्स्टिट्युट ऑफ इन्फेक्शियस डिसीसेझ या (संसर्गजन्य जंतूंपासून बनवलेल्या जैविक शस्त्रांबद्दल संशोधन करणाऱ्या) लष्करी संस्थेचे मेरीलँड राज्यातील फोर्ट डिट्रिक येथे कार्यालय आहे. 'यूसॅमरिड' असा सैनिक या संस्थेचा उल्लेख करीत अशा जंतूपासून बंदोबस्त व्हावा म्हणून लस बनवणे व त्यांचा प्रभाव रोखणे हे काम तेथे चाले.

१ जानेवारी १९८० रोजी पश्चिम केनियातील नझॉइगा साखर कारखान्याच्या परिसरातल्या उसाला पाणी देणाऱ्या पंपांची देखरेख करणारा चार्लस मोने हा केनियातील किटुम गुहेमध्ये मैत्रिणीबरोबर जातो; आणि सात दिवसांनी त्याच्या डोक्यात असह्य वेदना सुरू होते. त्याला विमानाने, नैरोबीच्या रुग्णालयात नेण्यात येते. पण विमानातच त्रास सुरु होतो. कोणत्या विषाणूने त्याच्या शरीरात प्रवेश केला आहे याचा शोध केला जातो. पण त्याआधीच रक्ताची उलटी होऊन, आतड्याचे वेटोळे फाटल्याचा आवाज येऊन मोने मरणोन्मुख होतो. त्याच्या शरीरातला विषाणू दुसरा यजमान शोधण्यासाठी बाहेर पडतो. मोनेला जबरदस्त उलट्या होतात. तो मरण पावतो. पण त्या उलटीचा फवारा डॉ. शेम मुसोकेच्या चेहऱ्यावर व डोळ्यात उडतो; आणि आठनऊ दिवसांनी डॉ. मुसोकेची पाठ व स्नायू भयंकर दुखू लागतात. शस्त्रक्रियेनेही फरक पडत नाही. किडनीचे काम मंदावते. डॉक्टर नंतर निदान करून सांगतात की त्यात मारबर्ग विषाणू आढळला. तो माकडांद्वारे जर्मनीतून तेथे आला असावा. एडसच्या या आगमनाने सारे चक्रावतात. डॉ. मुसोकेच्या रक्तातून मारबर्ग विषाणूचे संक्रमण होते. चार्ल्स मोनेच्या उलटीतून बाहेर पडलेल्या विषाणूचे सर्व श्रेय चार्ल्स मोनेलादेऊ असे इतरेजन म्हणतात. हा विषाणू शरीरात जाताच सात दिवसाच्या आत रक्तस्त्राव होऊन शरीराचा स्फोट होतो. माणसाच्या अंडुकल्या काळयानिळ्या होतात; फुगतात.

१९९३ साली रॉबिन मॅकडोनाल्ड हा व्यावसायिक शिकारी या किटुम गुहेच्या शोधासाठी येतो. तो लहान असताना वडिलांबरोबर या भागात भटकत असे. ते हत्तीची शिकार करीत. त्याचे वडील १९६७ साली विमान अपघातात मरण पावले. त्यावेळी तो तेरा वर्षांचा होता. आता ३६ वर्षांचा रॉबिन पुन्हा वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून या गुहेच्या शोधमोहिमेवर निघालेला आहे. या गुहेत त्या जीवघेण्या विषाणूंचा मुक्त संचार आहे. एल्गॉन पर्वताच्या पूर्व उतरणीवर जंगलाने घेरलेल्या दरीत ८००० फूट उंचीवर किटुम गुहेचे तोंड आहे. ही गुहा म्हणजे एल्गॉन पर्वतातली एक कोरडी पोकळी होती. हत्तींनी आपल्या पिलांना क्षार कसे खरडायचे हे शिकवताना पिढ्यानुपिढ्यांनी ही गुहा तयार झाली असावी अशीही कल्पना इयान रेडमाँडने मांडलेली होती. (स्पिलिओजेनिसस – हत्तींनी खोदकाम केलेली गुहा). विषाणूंच्या अस्तित्वाला व वाढीला ओलसरपणा वा उष्णता प्रतिकूल ठरते; कोरडेपणा



लागतो. गार हवेत तरंगत किंवा वटवाघळांच्या वाळलेल्या विष्ठेत ते जगू शकतात. मारबर्ग विषाणू पाच दिवस टिकू शकतात. एडसचे विषाणू यजमानाच्या शरीराबाहेर, हवेच्या संपर्कात फक्त वीस सेकंद टिकू शकतात.

रॉबिन त्या गुहेत जातो. एकूण जागतिक पर्यावरणाच्या संदर्भात या गुहेला काहीतरी गूढ महत्त्व होते. १९८० साली चार्लस मोने हा या गुहेत शिरला होता आणि आठ दिवसांनी मरण पावला होता. रॉबिनला गुहेच्या तोंडाशी काही कोळी दिसले. त्या कोळयांच्या जाळयात कीटक अडकत होते. या कोळयांमध्ये मारबर्ग विषाणू राहत असावेत. रॉबिनच्या पायाला कोळ्याचे जाळे लागते. हलकासा डंख होतो. डोक्यात रक्त वेगाने चढतेय असे रॉबिनला वाटते तो बाहेर येतो. त्याचा सहकारी ग्रँट त्याला विचारतो, "काम चांगलं झालं का?" रॉबिन उत्तर देतो, "ते सात दिवसांनी कळेल." "तुझ्या तोंडावर शिंतोडे उडालेले दिसताहेत... घाम आलाय.." बुटाला चिकटलेल्या प्राण्यांच्या विष्ठेने टबातले पाणी गढूळ होते.

हे विषाणू समुद्राच्या लाटांप्रमाणे मानवी समाजावर आघात करतात. पृथ्वीवर माणूस हा उपरा आहे; परावलंबी बांडगुळासारखा हा पृथ्वीचे शोषण करीत आहे. त्याला रोखण्यासाठी पृथ्वीने या विषाणूंच्या रूपाने जणू सैन्य पाठवलेले आहे. पृथ्वीवरचे जैविक पर्यावरण उध्वस्त होऊ नये म्हणून निसर्गाने घेतलेली ही दक्षता आहे.

...मेरीलँडमधील त्या युसॅम प्रयोगशाळेत एबोला विषाणूवर संशोधन चालू असते. अमेरिकन लष्करात पशुवैद्यकीय विभागात काम करणाऱ्या मेजर नॅन्सी जॅक्स, पती जेराल्ड आणि तिची मुले यांना केंद्रस्थानी ठेवून या संशोधनाची रूपरेखा देण्यात आली आहे. तिचा नवरा जेराल्ड जॅक्स हाही लष्करात पशुवैद्यक विभागातच आहे. परंतु तो प्रशिक्षणासाठी टेक्सासला गेलेला आहे. हे दोघे नवराबायको एकाच हुद्यावर एकाच युनिटमध्ये कामाला असल्याने लष्करी प्रशासनालाही त्यांचा विशेष विचार करावा लागतो. नॅन्सीलाही एबोला प्रकल्पात सामील होऊन रोगविकृती वैज्ञानिक म्हणून आपली क्षमता दाखवण्याची खुमखुमी आहे. तिच्याद्वारे हॉट झोनमधील कार्यपद्धतीची माहिती वाचकांना मिळते. माकडांवर तेथे प्रयोग चालू आहेत.

वॉशिंग्टन डीसीच्या पश्चिमेला दहा मैलांवर असणाऱ्या रेस्टन या गावी अमेरिकेत दरवर्षी आयात करण्यात येणाऱ्या १६००० माकडांना जागोजागच्या प्रयोगशाळेत पाठवण्यापूर्वी क्वारंटाइनमध्ये ठेवण्यात येते. हे काम हाझलटेन कंपनीतर्फे केले जाते. १ नोव्हेंबर रोजी या मंकी हाऊसमधील माकडे पटापट मरू लागतात. एकच खळबळ उडते. विषाणूतज्ज्ञांना पाचारण करण्यात येते. युएस ॲम रिडला कळवण्यात येते. संशोधनात असे आढळते की १९८०मध्ये चार्ल्स मोनेच्या मृत्यूला कारण झालेले विषाणूच या माकडांमध्ये आहेत; मोनेवर उपचार करणाऱ्या डॉ. मुसोकेच्या तोंडावर मोनेच्या उलटीचा फवारा उडतो; त्याच्या शरीरातून

काढलेल्या प्रतिद्रव्याचा वापर करण्याचा पर्याय येथे निघतो. परंतु मारबर्गसाठी उपयोगी असणारी ही चाचणी येथे लागून पडत नाही. पुन्हा वेगळे तर्क लढवले जातात. असा विषाणू पूर्वी कधी अमेरिकेत आलेला नाही; एबोला झायरेसारखा विषाणू अमेरिकेत आलाय म्हटल्याबरोबर लष्करी तज्ज्ञात एकच हलकल्लोळ माजतो. ही बातमी गुप्त ठेवून पुढची पावले उचलली जातात.

नॅन्सी व जेरी यांची या विषाणूबाबत अधिक संशोधन करण्याच्या कामी नेमणूक होते. ''हा विषाणू माझा शेवट करणार'' असे नॅन्सी म्हणते. अत्यंत गुप्तपणे हे संशोधन चालणार हेही तिच्या लक्षात येते.

नॅन्सी त्या माकडांचे विच्छेदन सुरू करते.

वृत्तपत्रात ''महाभयानक एबोला विषाणू व्हर्जिनिया प्रयोगशाळेत माकडांमध्ये सापडला'' अशा बातम्या येतात.

माकडांवर देखरेख ठेवणारा विल्यम फ्रांटिग हा पन्नास वर्षाचा कर्मचारी उलट्या होऊन, गलितगात्र झाल्यासारखा कोसळतो. त्याला रुग्णालयात पाठवण्यात येते. इतरही तेथील कर्मचारी असेच उलट्या होऊन बेजार होतात.

तशातच पिंजऱ्यातून एक माकड निसटते. ते कोणाला चावले तर?

त्याला पकडण्याची धावपळ सुरू होते.

पुढे मंकीहाऊस कायमचे बंद केले जाते. त्यात कागदाचे तुकडे जागोजाग चिकटवून त्यावर बॅसिल्स बॅसिलस नायगर नामक निरुपद्रवी जीवाणू पसरवले जातात. त्यांना मारणे हे कठीण असते. उरल्यासुरल्या विषाणूंची व नायगरची झटापट चालू राहील– राहू द्या असे लष्करी तज्ज्ञ ठरवतात.

या कादंबरीला नेहमीसारखे कथानक नाही. विषाणूचा शोध व बंदोबस्त या दिशेने सगळ्या घटनांची मालिका उभी राहते. आफ्रिका – अमेरिका यात कथानक घोटाळत राहते. १९७६ ते १९९३ असा सतरा वर्षांचा काळ यात येतो. लेखकाचा विषाणूबद्दलचा आणि जैविक युद्धतंत्राचा अभ्यास हा सर्व तपशील कथानकात गुंफून रहस्यमय रीतीने सांगण्याचा चटकदार बाज शेवटपर्यंत उत्कंठा टिकवून धरतो.

*द हॉट झोन, पृष्ठे ३०५, दोनशे रुपये*


लवकरच उपलब्ध !

प्रसिद्ध कन्नड लेखक श्री पूर्णचंद्र तेजस्वी यांच्या रसरशीत कथांचा संग्रह

**मायामृग**

अनुवाद : उमा कुलकर्णी

मूळ किंमत : **१०० रुपये** ■ सवलतीत : **८० रुपये**




**स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी...**
**जुलुम - हुंडा - संशय क्षणोक्षणी..**

# चितेवरच्या कळ्या

**वसंत गायकवाड**

**प्रा.** सिद्धार्थ देशमुख यांची मेहुणी, पत्नीची लहान बहीण मनीषा हणमंत पवार हिची जीवनकहाणी सादर करणारी 'चितेवरच्या कळ्या' ही कादंबरी.

सातारपासून ११ किलोमीटरवर कृष्णानदीच्या काठी आरफळ हे चारपाच हजार वस्तीचे गाव आहे. काळी सुपीक जमीन; बागायती पिके. संकरित ज्वारीच्या बियाणांची निर्मिती करणे हे तेथील खास वैशिष्ट्य.

हणमंत पवारांना सहा मुली. निशा, वर्षा, आशा, संध्या, उषा व सर्वांत लहान मनीषा. अर्धा एकर जिराईत शेतीच काय ती मालकीची. त्यामुळे लहानपण हलाखीत जाते. उषाचे पती सिद्धार्थ हे सातारला तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक. मनानं निर्मळ. शांत. व्यासंगी. गंभीर. त्यांच्या सल्ल्याने मनीषाही तत्त्वज्ञान विषय घेऊन बी. ए. व्हायचे ठरवते. पण अचानक इंजिनिअर हेमंतशी तिचा विवाह होतो आणि कॉलेज अर्ध्यातच सोडावे लागते.

मनीषा लग्न होऊन सासरी येते आणि दारातच तिला अडवले जाते. नणंद तिच्याकडून वचन घेते – आपली मुलगी तिच्या मुलाला देऊ असे. पण लग्नाच्या वेळी ठरलेली २१ हजार वरदक्षिणा देऊनही वर १० हजाराची मागणी होते; शिवाय मोटारसायकल. तिचे वडील मला हे झेपणार नाही म्हणतात. सासरे धनराज, सासू लक्ष्मीबाई, नणंद पूर्णिमा, मधला दीर शरद, धाकटा दीर शिशिर, – श्रीमंतीचा डामडौल.

पण त्या घरात आपलं स्वागत आनंदानं झालेलं नाही हे मनीषाच्या लक्षात येते. तिला मोलकरणीसारखं कामात राबवलं जातं.

पहिली रात्रही सुखद ठरत नाही. हेमंत मद्यपान करून धसमुसळेपणा करतो. तिचा थरकाप उडतो. त्याच्या मद्यप्राशनामुळे त्याच्या जवळ जाताना तिला किळस वाटते. तो तिच्यावर जबरदस्ती करतो. केस धरून दाणकन फरशीवर आदळतो. पुढे हेमंत तिला रोजच बेदम मारत राहतो. हुंड्यावरून कुरबुर चालू राहते. पंधरा दिवसांनी तिला माहेरी पाठवले जाते – सात हजार रुपये आणल्याशिवाय परत येऊ नको असे बजावले जाते.

तिचे वडील व सिद्धार्थभाऊजी तिला सासरी पोचवायला येतात. सासू त्यांना सांगते, ''सूनबाई काम नीट करत नाही. वस्तूंची नासधूस करते. कुजक्यासारखं टोचून बोलते. भांडणं

काढते. रिस्पेक्ट देत नाही. तुम्ही जावयाची हौस करा.''

–आणि मनीषाचा छळ चालूच राहतो.

त्यातच भरीला चंद्रप्रकाशभाऊजी तिला म्हणतो, ''वहिनी, किती मस्त दिसतेस तू! भलतीच सेक्सी दिसतेस. ती पूर्णिमा बोकीण झोपलीय. कोणीच घरी नाही.'' मनीषा त्याला ढकलून पूर्णिमा वन्संकडे धावते. पण तिला दिसतं की पूर्णिमा सखारामकडून 'बाम' चोळून घेतेय.

मनीषाला दिवस जातात. घरातले वातावरण बदलते. पण धुणीभांडी तिलाच करावी लागतात. हेमंत तिला संतोषी मातेच्या मंदिरात नेऊन सांगतो, ''तुझ्या पोटात गर्भ वाढतोय तो माझा नाही – मेहुण्याशी मजा मारत होतीस.'' ती नारळ घेऊन गाभाऱ्यात शपथ घेऊन सांगते, ''पोटात वाढणारं मूल माझ्या नवऱ्याचं आहे.'' तरीही तिला मारहाण होतच राहते.

मनीषा तेथून मग पळ काढते; बहिणीकडे येते. प्रवासात तिला तिची मैत्रीण भेटते. माया पंडित तिला माहिती देते, ''तुझे मिस्टर हेमंत देसाई – कॉलेजमध्ये धिंगाणा घालत. फार लफडी. पोरींना फशी पाडत. एक तर आयुष्यातून उठली.''

–मनीषाचे वडील म्हैस विकून जावयासाठी अंगठी–पोशाख घेऊन दिवाळसण करतात.

पण तिचा छळ कमी होत नाही.

एकदा ती आपल्या भावोजींना सांगते, ''माझ्या मृत्यूनंतर माझे अग्निसंस्कार कृष्णातीरावर विशिष्ट खडकावर करावेत. माझी रक्षा कृष्णेत मिसळावी.''

हेमंत तिची गर्भजलपरीक्षा करून घेतो. मुलगी असते.

रात्री तिला तो ॲबॉर्शन कर म्हणतो. सातवा महिना. ॲबॉर्शन अशक्य. तो तिला मारहाण करतो. तरीही डोहाळेजेवण होते. पुन्हा हेमंत ॲबॉर्शन नाहीतर घटस्फोट असा तिढा घालतो.

मनीषा त्याच रात्री घर सोडून निघते. पत्रात लिहिते,''मी हे घर सोडून जात आहे. होणाऱ्या बाळाची शपथ घेऊन सांगते की मी तुमच्याशी एकनिष्ठ होते. माझा शोध करू नका.'' पण स्टेशनवरच हेमंत तिला गाठतो. घरी नेतो.

मुलगी होते. पण मनीषाचा पुढेही छळवाद चालूच राहतो.

कमरेत लाथ घालून हेमंत तिचे केस ओढतो. ''लग्न झाल्यापासून कसली मन:शांती लाभू दिली नाहीस. साली! कुत्रे! आज तुझं कातडंच सोलतो.'' नायलॉनच्या दोऱ्यांनी तिला बांधून तोंडावर चिकटपट्ट्या लावतो. दोन दिवस खोलीत कोंडून ठेवतो.

...मनीषा नंतर एक पत्र लिहिते; आणि ते सिद्धार्थला पाठवते.

ते पत्र मिळाल्यावर सिद्धार्थ येतो –



पण त्याला ती संपूर्ण भाजलेल्या अवस्थेत दिसते.

...एक अत्यंत ह्रदयद्रावक अशी ही कहाणी आपल्या अंत:करणाचा ठाव घेते.

तिने व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणे तिचे अंत्यसंस्कार कृष्णातीरावरच्या त्या खडकावर होतात. तिची रक्षा कृष्णा नदीत विसर्जित केली जाते.

सिद्धार्थ प्रारंभी आपली कैफियत देतो. तीही भावनांना साद घालणारी आहे.

मनीषाची ही दैनंदिनी दहा वर्षे जपून ठेवून, नंतर प्रा. सिद्धार्थ प्रकाशात आणतो. ''या सोनेरी ह्रदयाच्या अति संवेदनाक्षम मनाच्या मुलीला तिथं असलं जीवन जगत असताना नेमकं काय वाटलं असेल? तिनं हे सारं कसं पेललं? कसं सोसलं? ...तिची ही दैनंदिनी – तिच्या कडू अनुभवाची गाथा – ह्रदयाच्या आतल्या कप्प्यात जपून ठेवलेली.

''रात्र झाली. काळोख पडला, लवलवणाऱ्या अग्निशिखा दिसल्या की मनीषाची याद येते. मन कापरासारखं भुरुभुरु जळायला लागतं. मनीषाच्या असंख्य भावनांचे दर्शन देणाऱ्या मूर्ती ...मनासमोर तरळत राहतात.'' असे तो म्हणतो.

मनीषासारख्या असंख्य भगिनींना अग्निपरीक्षेच्या तोंडी जावे लागते. ज्या मातेच्या पोटी जन्म घेता तिलाच अठ्ठावीस युगांची यातना तुम्ही देताहात. समस्त स्त्री आणि पुरुषांनो ! जरा अंतर्मुख व्हा. गांभीर्यानं विचार करा. मनीषाची ही दैनंदिनी – कोलमडलेल्या मन:स्थितीत जमेल तशी लिहिलेली. तिनं जसं जीवन भोगलं, तसं लिहिलंय... ती तुमच्यापुढे ठेवतोय.'' अशा शब्दांत सिद्धार्थ शेवट करतो.

***चितेवरच्या कळ्या, पृष्ठे २००, एकशेपंचवीस रुपये***

## शेअरमध्ये बुडालेले दहा लाख डॉलर्स परत वसूल करण्यासाठी केलेली जंगी व्यूहरचना

## नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस

**अनु. : अंजनी नरवणे**

शेअर मार्केटच्या कार्यपद्धतीचा ज्यांचा अभ्यास चांगला असतो, ते एकेका दिवसात अब्जाधीश होतात किंवा पार कफल्लकही! हर्षद मेहता या व्यक्तीमुळे लाखो भागधारकांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले; आणि त्याने दिलेल्या सणसणीत दणक्याने भारतीय शेअर मार्केट इतका गडगडला की अजूनही तो लटपटतो आहे आणि त्याच्याबद्दल कसलाही भरवसा नाही. दि. ९ जून १९९८ रोजी हर्षद मेहताने जोरदार खरेदी करून नंतर

भराभर शेअर्स विक्रीला काढले; आणि मोठमोठ्या कंपन्यांचेही पुन्हा धाबे दणाणले. 'नॉट ए पेनी मोअर, नॉट ए पेनी लेस' या कादंबरीत हाच विषय आला आहे.

शेअर मार्केटच्या कार्यपद्धतीचा चपखल अभ्यास असणाऱ्या हार्वे मेट्काफ याने प्रॉस्पेक्टा ऑईल नावाची कंपनी इंग्लंडमध्ये स्थापन करतो. १० सेंटचा एक असे २० लाख शेअर्स विक्रीला काढतो. विक्रीची किंमत ५० सेंट ठेवून आपल्याच माणसांकरवी ते विकत घेतो आणि वृत्तपत्रात अनुकूल बातम्या आणून त्यांची किंमत ५० सेंटवरून तीन डॉलर्सपर्यंत नेतो. पुढे ती पाच डॉलर झाली होते. आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलमधील पदवीधर डेव्हिड केसलर याला २० हजार डॉलर्स पगारावर ठेवून, संभाव्य बड्या गुंतवणूकदारांना 'आतली बातमी' अनौपचारिक बोलण्यात देऊन हे शेअर्स नऊ-दहा डॉलर्स प्रमाणे विकण्याची गुप्त योजना हार्वे आखतो.

त्याप्रमाणे त्याच्या जाळ्यात बर्नी सिल्व्हरमॅन, लॉर्ड ब्रिगस्ले, आणि स्टिफन ब्रॅडले वगैरे सापडतात; स्टिफन ब्रॅडले हा ६.१० डॉलर भावाने ४० हजार शेअर घेतो. बर्नी सिल्व्हरमन ७.४० भावाने ३५ हजार शेअर्स घेतो. लॉर्ड जेम्स ब्रिगस्ले बँकेकडून आपल्या जमिनीवर दीड लाख पौंड कर्ज घेऊन ७.२५ भावाने ३५ हजार शेअर्स खरेदी करतो. डॉ. ॲड्रियन टायनर ७.२३ दराने २५ हजार शेअर्स घेतो. जीन पियरी लॅमॉन्स ७.२० ने २५ हजार शेअर्स घेतो.

तीन साडेतीन महिन्यात प्रॉस्पेक्टा ऑईलमध्ये घातलेले स्वत:चे पैसे काढून घेऊन हार्वे मटेकॉफ वर साठ लाख डॉलर्सचा नफा मिळवतो. कारण वरच्या चौघांनी १ लाख ३५ हजार शेअर्स १० लाखावर डॉलर्स खर्च करून घेतले होते. प्रॉस्पेक्टा ऑइल लौकरच उत्पादन सुरू करील, आणि शेअरचा भाव २० डॉलर्सवर जाईल या आशेने सर्वांनी हे शेअर्स खरेदी केले होते. या चौघांना डेव्हिडने खाजगी गप्पात ऑइल लागणार व शेअर भाव वाढणार एवढीच हिंट सूचकपणे दिलेली असते.

हार्वे मेट्काफने अत्यंत धूर्तपणे हा सर्व बनाव घडवून आणला. कागदोपत्री त्याचे कुठेही नाव नसते. त्याच्या नावावर एकही शेअर आता नव्हता. त्याने कुठलाही कायदा मोडला नव्हता. जिऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्टची भाषाही अशी होती की कायद्यात तो कुठे अडकला नसता. डेव्हिडलाही त्याने काम होताच नोकरीतून मुक्त केले होते. त्याचे ऑफिस विकून टाकले होते; त्याचे निवासस्थानही सोडण्यास त्याला भाग पाडले. हार्वे व डेव्हिड हे कधीही एकमेकांना भेटलेले नव्हते. दहा लाख डॉलर्स मिळवून समाधानाने हार्वे मेट्काफ शँपेनची बाटली उघडतो.

या चौघांना मात्र एके रात्री कळते की प्रॉस्पेक्टा ऑइलच्या खाणीत तेल लागलेले नाही. त्याबरोबर शेअरचा भाव गडगडतो. डेव्हिड स्वत:चे ५०० शेअर्स ७.२५ भावाने विकून मोकळा होतो. पण सकाळी ५.९० डॉलर असणारा भाव संध्याकाळी ३.१५ होतो; आणि ५० सेंटपेक्षाही खाली तो जाईल अशी चिन्हे दिसतात. आपण पुरते फसलो हे प्रत्येकाच्या



लक्षात येते.

स्कॉटलंड यार्डचा डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर क्लिफर्ड स्मिथ स्टीफन ब्रॅडलेला भेटून याबद्दलची माहिती मिळवतो; चौघांचे मिळून दहा लाख डॉलर्स बुडले आहेत हे सांगतो. या प्रकारात हार्वेचा संशय असला तरी तो कागदोपत्री कुठेही अडकलेला नाही हेही स्पष्ट करतो. अशा पद्धतीने यापूर्वीही गंडा घातलेला आहे. प्रॉस्पेक्टाचे दिवाळे निघायची शक्यता आहे; पण त्याचे सूत्रधार मात्र पकडले गेले तरी त्यांच्याकडून पैसे वसूल होणे अशक्य आहे इ. हार्वे मेट्काफची माहिती हा इन्स्पेक्टर देतो. बॉस्टनमध्ये शेअरच्या संदर्भात लबाडीचे जे व्यवहार होतात त्यात या हार्वेचा हात असतोच. हार्वेने हार्वर्ड युनिव्हर्सिटीला देणग्या दिलेल्या असतात; तो नामांकित चित्रांची खरेदी करतो. तो देशोदेशी हिंडतो. विंबल्डनसारख्या स्पर्धांना हजर असतो. त्यामुळे त्याला या फसवाफसवीच्या प्रकरणाशी जोडणे अवघड ठरते. तो स्वत: कुठेही गुंतत नाही. या प्रकरणात डेव्हिड केसलरला तो पुढे करतो; पण त्याला तो कधी भेटत नाही. इलियट व कूपर यांना पुढे करून तो हा कारभार करून घेतो. त्यांच्याविरुद्ध वॉरंटस निघतात पण ते दोघे दक्षिण आफ्रिकेत पळून जातात. डेव्हिडला पकडण्याची मात्र पोलिस घाई करू इच्छित नाहीत.

प्रा. स्टिफन ब्रॅडले उरलेल्या तिघांना बोलावून घेतो आणि आपले गेलेले दहा लाख डॉलर्स हार्वे मेट्काफकडून वसूल करण्याची योजना आखतो.

ही योजना अफलातून आहे; आणि नाट्यपूर्ण आहे.

त्यासाठी हे चौघे निरनिराळी नाटकेही करतात. हिंदी सिनेमावर ताण करणारी वेषांतरेही करतात. 'अमर, अकबर, अँथनी'टाइप मालमसालाही त्यात असतो.

लॉर्ड जेम्स याच दरम्यान एका सुंदर मॉडेलच्या प्रेमात पडतो. तिलाही या सर्व बनावाची माहिती असते.

आणि खूप धमाल उडते.

शेवटी पुन्हा वाचकांना दोन जबरदस्त धक्के दिले आहेत.

ते येथे सांगून कथानकातील रहस्य उघड करण्यात हशील नाही. परंतु या कलाटण्यांमुळे कथावस्तूची रंजकता वाढतेच वाढते.


हे चौघे दहा लाख डॉलर्स खर्चासह वसूल करण्यात यशस्वी होतात. आणि नंतर बातमी येते की प्रॉस्पेक्टा ऑइल खाणीत खरोखरच तेलाचे साठे सापडलेले आहेत. शेअरचा भाव वाढत आहे.

शेवटी त्यांना प्रश्न पडतो की हे वसूल केलेले दहा लाख डॉलर्स हार्वेला परत कसे करायचे?

-आहे की नाही नाट्यपूर्ण कलाटणी?

विंबल्डन सामने, चित्रप्रदर्शने व आर्ट गॅलरीज, ऑक्सफर्ड विद्यापीठातील पारंपरिक कारभार, शेअर मार्केट व ब्रोकर्स, हार्वेने मिळवलेल्या यशामागची त्याची धूर्त चलाखी हे सारे आपल्याला कथानकामध्ये अधिकाधिक गुंतवत राहते.

*नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस, पृष्ठे २१०, एकशेवीस रुपये*




## जळतानाही जगाला उजळण्याचा तेजोमंत्र देणारी तेजोनिधी व्यक्तित्वे

# शेलका साज

**शिवाजी सावंत**

‘मृत्युंजय’ची पताका मानानं मिरवत आणि एकेक भाषा पादाक्रांत करीत शिवाजी सावंत आपलं स्थान पक्कं करीत भारतीय सारस्वतात घोडदौड करीत आहेत. आता युगंधर श्रीकृष्णाचा त्यांचा प्रदीर्घ प्रकल्प आकार घेतो आहे. प्रचंड शिल्पकाम करताना अधूनमधून गंमत म्हणून या दगडावर चार छिन्न्या मार, त्या दगडातून एखादी छोटी कलाकृती घडव असाही त्यांचा खेळ रुचिपालट करण्यासाठी चालूच असतो. मग ते कार्यक्रमांची आमंत्रणे घेतात, संमेलनांना जातात; लहानमोठ्या प्रकाशनांमध्ये रस घेतात. छोटेखानी दिवाळी अंकांचेही लेख याच झटक्यात पूर्ण करतात. पण प्रत्येक कामात आपला जीव ओतूनच ते करायचे हा त्यांचा बाणा आहे. त्यामुळे छोटा लेख असो, भाषण असो की अन्य काही कार्यक्रम असो, सावंतांची त्यातली गुंतवणूक ही अर्जुनाला दिसणाऱ्या पोपटाच्या डोळ्यासारखी नेमकी असते आणि सारे काही रसवंत करायची त्यांची प्रतिज्ञा असते.

‘शेलका साज’ हा त्यांच्या २२ लेखांचा संग्रह. हा साज शेलका असल्याने त्यात सर्व प्रकारचा ऐवज आहे.

किल्ले सुधागडावर कवी कुलेशाला संभाजी महाराज बोलावतात, उरभेट देतात आणि औरंगजेबाचा पुत्र शाहजादा अकबर आपल्या जन्मदात्याविरुद्ध बंडाचा प्रस्ताव घेऊन आला असताना त्याला संभाजी महाराज कसे रोखतात – त्याची कहाणी ‘किल्ले सुधागड’ यात सावंत



सांगतात.

रायगडच्या बालेकिल्ल्यातल्या खासे महालात श्री शिवाजीराजे अखेरच्या दुखण्यात कसे दिवस काढत होते याचे चित्रदर्शी वर्णन करून त्यांच्या धीरोदात्त व्यक्तिमत्त्वाचे दर्शन सावंत घडवतात.

‘‘आरक्त देखिजे डोळा, ग्रासिले, सूर्यमंडळा सूर्यमंडळा, सूर्यमंडळा, जगदंबा! चैत्री पुनवेचा, हनुमान जयंतीचा सूर्य रायगडाच्या बालेकिल्ल्याच्या ऐन माथ्यावर असताना महाराजांनी रायगडाच्या हनुमंतानी उड्डाणी झेप घेतली. सूर्यमंडळ कब्जा करण्यासाठी’’ असा भारावून टाकणारा शेवट सावंत करतात.

‘शिवभक्त सरलष्कर’ ही हकीकत आहे १६६५ सालची, औरंगजेबाच्या ब्रम्हपुरच्या छावणीतली. संताजी घोरपडे याच्या पराक्रमाची. म्हसवडच्या नागोजीराव माने यांचा पुत्र सिधोजी याने संताजीबद्दल छत्रपती राजारामाचे मन कलुषित केले. त्यांनी धनाजी जाधवाला सरसेनापती पद दिले. आणि पुढे शिवपिंडीच्या पूजेत मग्न असलेल्या संताजीच्या मानेवर नागोजीने तलवारीने आघात करून त्याचा बळी घेतला. औरंगजेबाकडे ते शिर घेऊन जातो. तेथे येसूबाई संताजीचं शिर तबकात पाहून डोळ्यात अश्रू ढाळत म्हणतात, ‘‘सरलष्कर, तुम्ही खरे शिवभक्त. आजवर आम्हांस मुजरा केलात, आता या क्षणी आमचा मुजरा रुजू करून घ्या.’’ औरंगजेब मनात म्हणतो, ‘‘ऐसी एकभी बहू-बेटी-बेगम हमारे तैमूर खानदानमें क्यों नही पैदा होती? ये मुल्क कभी नही शिकस्त लेगा – जहाँ ऐसे सालार है – ऐसी मलिकाएं है। ऐसे शाहजादे है। तौबा! हम लौटेंगे लाल किले देहली या नही?’’

पुस्तकात सगळ्याच ऐतिहासिक कथा आहेत असे मात्र नाही.

‘शिवकालीन मावळा’ हा मावळ्याचे खाणे, पेहराव, जगणे, लढणे, याची माहिती देणारा लेख आहे. तर शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू दाखवणारा गूढरम्य मनफूल हा लेख आहे. ३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांनी रायगडावर चैत्री पुनवेला आगमन केले. चंद्र हा कल्पनाशक्तीचा कारक. शिवरायांच्या मनाचं फूलही त्या आकाशातल्या चंद्राच्या लाटांवर हेलकावे खात असावे असे सावंत सुचवतात. शिवरायांची तरल कल्पनाशक्ती अनेक प्रसंगात दिसते, तिचे चंद्रभावाच्या प्रभावाच्या रूपात सावंत स्पष्टीकरण – समर्थन करू पाहतात. संभाजीच्या मनाचे शल्यही मांडतात. शिवराजांना चाणक्य नीती ज्ञात होती. चाणक्यासारखा कोणी त्यांना भेटला असता तर महाराष्ट्रात एक नवे पर्व सुरू झाले असते असे सावंतांना वाटते. चाणक्याची अर्थशास्त्रीय बुद्धिमत्ता आणि शिवरायांची सर्वसामान्यांबद्दलची राजस कणव यांची सांगड पडली असती तर दुग्धशर्करा योगच या देशातील समाजपुरुषाने चाखला असता. शिवरायांचा प्रधान अण्णाजी दत्तो याचा तो वकूब नव्हता; अण्णाजीने जमीनधारा पद्धत जमिनीची प्रत बघून सरकारी धारा वसूल करणे ही वापरली; त्याऐवजी प्रत्येक किल्ला

धनधान्याने समृद्ध करावा व गवतकाडीने बंदिस्त करावा, शेतकऱ्याला जमिनीचा कस वाढवायला सहाय्य करावे – उत्पादनक्षमता वाढवावी – असा शिवरायांचा मानस होता. पण अण्णाजीला तो विचार प्रत्यक्षात आणता आला नाही असे सावंतांचे प्रतिपादन आहे. अण्णाजी दत्तो याला ते महाराष्ट्रातील शेतीच्या दुरावस्थेबद्दल जबाबदार धरतात.

कामगार नेते मनोहर कोतवाल, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, अस्पृश्यांचा आधारवड राजर्षी शाहू महाराज यांच्यावरचेही लेख या संग्रहात आहेत.

एका वाचकाने कसा गंडा घातला याचा किस्सा 'चलाख'मध्ये आला आहे.

ऐतिहासिक ललित लेखन – एक विचार, मी आणि कविता हे दोन लेख साहित्यविषयक चिंतन प्रकट करतात, तर शेवटी 'तू नसतीस तर' ही कविता आईबद्दलच्या कृतज्ञतेच्या भावनेने ओथंबून निथळणारी आहे.

''जळतानाही जगाला उजळण्याचा तेजोमंत्र सूर्याला देणारी, केवळ तूच'' असे म्हणून ''तू केवळ एक व्यक्ती किंवा जीव नसून'', तू एक जीवनतत्त्व व जीवनसत्य आहेस असे सावंत म्हणतात.

''तू आहेस एक अतितापासून ते अनागतापर्यंतचे
एक जीवनतत्त्व, एक जीवनसत्य.
ज्याचे एकमेव नाव आहे व असू शकते आई!''

सावंतांचा हा 'कोल्हापुरी' शेलका साज भरजरी आहे; भव्य आहे; आणि भारावून टाकणाराही आहे. दुसऱ्या आवृत्तीत तो अधिकच नेटका व चकमकीत होऊन चमकतो आहे.

***शेलका साज, पृष्ठे १७२, एकशेवीस रुपये***


**१०वी, १२वी नंतरच्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना !**

***आजच्या जीवघेण्या स्पर्धात्मक जगात व्यवसाय कोणता आणि कसा निवडावा***
***याविषयी समग्र माहिती देणारे एकमेव पुस्तक***

# व्यवसाय मार्गदर्शक

पृष्ठे : **३२६** किंमत : **१००** रुपये
पोस्टाने : **११५** रुपये

*मूळ इंग्रजी लेखिका : **जयंती घोष***
*अनुवाद : **मीना किणीकर***

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे. ✆ ४७६९२४
**मेहता बुक सेलर्स,** भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. ✆ ५२२३०४




# एक आगळी-वेगळी स्पर्धा

**कर्णाच्या जीवनावर मराठीत अनेक कादंबऱ्या आहेत.**
**सदर परिच्छेद त्यापैकी कोणत्या पुस्तकातील आहे**
**ते *पुस्तक* ओळखा व बक्षीस मिळवा.**

*''जीवनातल्या निस्तेज भोगापेक्षा मी मरणोत्तर लाभणारी उदात्त कीर्ती मोलाची मानतो. मी त्याच जीवनाचा स्वीकार करीन. आपण माझ्या हितासाठी आलात, मला सावध केलंत, याचं विस्मरण मला केव्हाही होणार नाही. सामान्य मानव मी. माझ्या हिताच्या चिंतेनं साक्षात सूर्यानं धावावं यापेक्षा धन्यता कोणती? अन् माझं यश कुणी मानवानं हिरावून घेण्यापेक्षा ते देवांनी लुटलं, तर त्यापेक्षा दुसरं भाग्य कोणतं?''*

अचूक उत्तर देणाऱ्या पाच स्पर्धकांना (लॉट टाकून) प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके बक्षीस देण्यात येतील. **उत्तर पाठवण्याची मुदत – १५ ऑगस्ट १९९८**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,**
मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे – ४११०३०.


शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं आणि साहित्यप्रेमींना खूषखबर
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात
तासन् तास मनसोक्त पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी
**कोल्हापूरमधील एकमेव ठिकाण**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर ४१६०१२.
फोन : ५२२३०४ टेलिफॅक्स : ५२१८८१

# फुले आणि काटे

## ते साहित्य दुबळेच राहणार !

प्रचलित मानवी जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडले पाहिजे अशी अपेक्षा केली जाते. फेब्रुवारी महिन्यात व्हावयाचे साहित्य संमेलन ज्यासाठी लांबणीवर पडले त्या लोकसभा निवडणुका झाल्या - नवे बहुपक्षीय सरकार सत्तेवर आले. या नव्या सरकारचे आयुष्य, सर्व संमतीचा राष्ट्रीय कार्यक्रम, समान नागरी कायदा, धर्मनिरपेक्षता, घटनेचे पुनरावलोकन, सार्वजनिक भ्रष्टाचार, सत्तारूढ भाजपाकडून देशाच्या एकात्मतेला धोका, अण्वस्त्र निर्मिती अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या व ज्वलंत प्रश्नांवर रोज वादविवाद झडत आहेत. पण यापैकी कोणत्याही मुद्द्याचे प्रतिबिंब संमेलनातील परिसंवादांच्या विषयात पडलेले नाही, पडू देण्यात आले नाही. संमेलनातच काय, पण मराठी साहित्यातही या विषयांना फारसे स्थान मिळणार नाही. कारण हे विषय 'असाहित्यिक' आहेत, असे आम्ही जणू ठरवूनच टाकलेले आहे! ...राजकारणाच्या बागुलबुवाला भिऊन कलात्मकतेच्या सुरक्षित भुयारात बसून आम्ही ललित साहित्यच लिहिणार असू तर राष्ट्रीय चिंता वाहणारे हे वस्तुनिष्ठ साहित्य कुणी लिहायचे? शेतकऱ्यांनी, कामगारांनी, राजकीय पुढाऱ्यांनी का व्यापाऱ्यांनी? हे आव्हान उघडपणे साहित्यिकांनाच स्वीकारावे लागणार आहे... ज्या साहित्यात असा प्रभाव पडलेला नाही ते साहित्य एकांगी, अधू, पांगळे, दुबळे राहणार हे उघड आहे.

–शेषराव मोरे (दैनिक सामना, २४-४-९८)

## अजून यौवनात मी

मी ६६ वर्षांचा आजारी म्हातारा असलो तरी माझे हृदय तरुणच आहे. शरीर साथ देत नसेलही, पण हृदय तर साथ देते! ज्याला त्याचे हृदय साथ देते असा कवी शेवटपर्यंत तरुण माणूस जाणवणारा कवी असतो... वयाचा आणि कवितेचा संबंधच काय? जात व धर्म याप्रमाणेच वय व प्रतिभा यांचाही काही संबंध नसतो. फक्त माणसाने स्वतःला फसवू नये. "करून करून थकले आणि देवपूजेला लागले" असे सुज्ञ धोरण अमलात आणणारी ही बुद्धिजीवी मंडळी आहेत. सर्व काही हवे असते. पण नको नकोचे नाटक सुरू असते. फसवून मी स्वतःला फसवायचे किती? नुसतेच सावल्यांना बिलगायचे किती? माझे असे स्पष्ट मत आहे की ज्याला यशस्वी कविता लिहायची असेल त्याने आपण जे नाही ते आपण आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न करू नये. पवित्र्यांमुळे शब्दांचे पावित्र्य बाटते. स्वतःच्या हृदयाला जे पटते तेच लिहावे. टोळयांच्या टाळया मिळवण्यासाठी लिहू नये. मी भरपूर



काव्यलेखन केले. अवांतर लेखनही केले. पण माझे दुःख हे आहे की मी अजूनही पुरेसे व मनासारखे लिहू शकलो नाही. आळशीपणामुळे व जगण्याचेच तारतम्य नसल्यामुळे मी मला हवे तसे व हवे तेवढे लिहू शकलो नाही.

– सुरेश भट (लोकमत दि. २४-४-९८)

## विनोदी साहित्याचे श्रेष्ठत्व

विनोदी साहित्य जीवनाचे अस्सल स्वरूप जाखवते. म्हणून गंभीर लेखन ज्या उंचीवर जाते ती उंची विनोदी लेखनाला कधीच गाठता येत नाही. त्यामुळे अभिजात साहित्यात विनोदी साहित्य कधीच समाविष्ट करता येणार नाही असे म्हणण्यात येते.

हे कितपत खरे आहे ? मला वाटते, या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती ही की, सगळेच गंभीर लेखन हे श्रेष्ठ साहित्य असतेच असे नाही. त्यातले काही गंभीर लेखनच हे चांगल्या दर्जाचे साहित्य असते. तसेच काही विनोदी लेखनच चांगल्या दर्जाचे असते. ते जर खरेखुरे विनोदी लेखन असेल तर त्या विनोदी लेखनात चांगले साहित्यगुण असावयासच पाहिजेत.

विनोद किंवा हास्यनिर्मिती ही एखाद्या विसंगतीतून निर्माण होते. ही विसंगतीची जाणीव असते. एखाद्या लहान मुलालासुद्धा ही जाणीव असते. अगदी रांगणाऱ्या मुलाला एखाद्या सतरंजीवर किंवा गालिचावर ठेवले आणि त्या सतरंजीला एखादे छिद्र किंवा गालिचावर एखादा शाईचा डाग असला तर त्या मुलाचे लक्ष तिकडे प्रथम जाते आणि रांगत रांगत येऊन ते मूल बोटाने ते काय आहे हे खरवडून पाहते. त्याला बोलता येत नाही. पण आपल्या कृतीतून ही गोष्ट येथे विसंगत आहे, असे ते दाखवते. म्हणजे ही जाणीव अगदी नैसर्गिक आहे. पण या विसंगतीतून हास्य निर्माण होत नाही. गणिताच्या पायऱ्या मांडताना एखादी पायरी चुकली किंवा विसरली तर पुढची पायरी विसंगत वाटते. पण तरीही तेथे हास्य निर्माण होत नाही. कारण केवळ वैचारिक पातळीवरील ही विसंगती आहे. पण मनुष्यस्वभावातून ही विसंगती आपल्याला जाणवते तेव्हा तेथे हसू येते.

अगदी एकसारखे दिसणारे दोघे जुळे भाऊ होते. त्यातील एकजण पाण्यात बुडून मेला. नंतर पुढे दुसऱ्या भावाला एक गृहस्थ भेटले. त्यांनी त्या भावाला काय विचारावे? 'अरे, बुडून मेला. तो कोण? तू का तुझा भाऊ?' या प्रश्नातली विसंगती आपल्याला जाणवते आणि आपल्याला हसू कोसळते. मनुष्यस्वभावाची एक गंमत आपल्याला येथे समजते. अज्ञान, मूर्खपणा, बावळटपणा त्यातून व्यक्त होतो. म्हणून हे हास्य निर्माण होते.

– प्रा. द. मा. मिरासदार (परळी सा. संमेलन अध्यक्षीय भाषणातून)

## अनुवाद : संस्कृतीचा फरक

कुठल्याही पाश्चात्य कादंबरीचा अनुवाद करताना आपल्याला एक मोठा फरक जाणवतो तो म्हणजे संस्कृतीचा. पाश्चात्यांच्या स्त्री-पुरुष संबंधाबद्दलच्या कल्पना आम्हां भारतीयांपेक्षा खूपच वेगळ्या आहेत. त्यांचं सामाजिक जीवनही पुष्कळच स्वैर आहे. त्यांचं प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात पडलेलं दिसतं. पण तशा वर्णनात एक सहजता असते. एक मोकळेपणा असतो. आपल्या नीति-अनीतीच्या कल्पनेत न बसणाऱ्या गोष्टी अनेकदा कथेच्या ओघात सहजपणे घडलेल्या दिसतात. अगदी नावाजलेले आणि चांगल्या दर्जाचे लेखकसुद्धा स्त्री-पुरुषांच्या शृंगाराची वर्णने तपशीलवार लिहितात, ती त्या भाषेत वाचताना फारशी गैर वाटतही नाहीत. पहिल्या प्रथम धक्का बसला तरी त्याच प्रकारची दहा वर्णनं वाचल्यावर भारतीय भाषेत आणायचं म्हणजे हे आपल्या संस्कृतीला पचेल की नाही हे भान ठेवावंच लागतं. नाहीतर पुस्तकाला उगीचच सनसनाटी आणि बाजारू स्वरूप येऊन त्यातल्या आशयावर अन्याय होतो. तेव्हा माझ्या मते 'ही किस्ड् हर' या इंग्रजी वाक्याचा 'त्याने तिचा हात हातात घेतला' असा अनुवाद केला तर ते फारसं वावगं ठरणार नाही; आणि त्यानंतरचं वर्णन कथानकात बाधा येत नसेल तर न केलेलंच बरं.

-लीना सोहोनी (भाषा आणि जीवन १६-१ हिवाळा १९९८)

## 'हे आमचं बायको' - तंजावर मराठीची वैशिष्ट्ये

तंजावरची आजची लिखित मराठी भाषा भोसलेवंशचरित्राला (इ. स. १८११) खूपच जवळची, त्यातील भाषेच्या प्रकृतीशी मिळतीजुळती आहे. म्हणजे पावणेदोनशे वर्षात तिच्यात फारसे बदल झालेले नाहीत. असे होण्याचे कारण म्हणजे तंजावरला, सरफौजीच्या मृत्यूनंतर मराठीतून फारसे लेखनकार्य झालेले नाही हेच संभवते. महाराष्ट्रात १८३५च्या पुढे पुस्तके, वृत्तपत्रे यांच्यामुळे विचारांच्या सार्वजनिक आदानप्रदानाचे माध्यम म्हणून मराठी लेखन झाले, सतत होत राहिले. त्यामुळे तेथील मराठीत सतत बदल होत गेले, आजही होत आहेत. तंजावरला मात्र विचारांच्या सार्वजनिक आदानप्रादानाचे माध्यम म्हणून मराठी लेखनाचा वापर सरफौजीच्या मृत्यूनंतर थंडावला. तंजावरला दखल घेण्याजोगी ग्रंथ निर्मिती झाली नाही. कारभारात मराठीला स्थान राहिले नाही. त्यामुळे सततच्या वापरामुळे हाणारे बदल, प्रगतीही झाली नाही. तंजावरची लिखित मराठी ही इ.स. १८१०-२०च्या दरम्यानच थबकून राहिलेली दिसते.

'भीम सेनापती नवी बापाचा मार केले' येथे कर्ता प्रथमेत असला तरी वाक्य कर्मणी प्रयोगात आहे.

'शिवाजी राजांची .. भांडत होते' येथे कर्ता तृतीयात परंतु वाक्य कर्तरी प्रयोगात आहे.

'भगवे निशाण याचे हत्ती दोन' विशेष्यानंतर विशेषणांची योजना सर्वत्र आढळते.

'दिल्लीचा वकील दिलदिलेखान म्हणार' येथे म्हणणार, म्हणणारा, म्हणवून घेणारा अशा अर्थांनी 'णार' प्रत्यय वापरला जातो. -लेले, -लेली या प्रत्ययांऐवजी 'ल' 'ली' एवढेच प्रत्यय वापरून भागवले आहे. उदा. उदली बिरुदे (उरलेली बिरुदे)

'पात्रवर्ण अति चमत्कारवणी आहे' येथे वणी प्रत्यय सारखा 'वाणी' या अर्थी वापरला आहे. 'आजही' बाप रागावल्यावाणि दिसतुया' असा ग्रामीण प्रत्यय वापरला जातो. त्याचे येथे स्मरण होते.

या सर्वांपेक्षा मराठी भाषकाला घोटाळ्यात टाकणारी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे शब्दांच्या लिंगवचनात दिसणारा फरक. हा फरक लिखित व बोली अशा दोन्ही प्रकारांत जाणवतो; द्रविड भाषा सान्निध्याचा तो परिणाम असला पाहिजे. 'भाषा जुनी दिसतात' येथे वचनात फरक आहे.

बोली भाषेत 'हे आमचं बायको' येथे बायको शब्दाला 'हे' हा शब्द म्हणजे नपुसंक लिंगी वापरला आहे.

चालू बोलीभाषेचे काही नमुने पहा. 'वराड फार बेष झालं. तेवडे लोकहून आले होते. व्याही, आमी असं काई वाटतं नवतं."

"अमी कद्दिन मार्केटाला गेलो नाही."

"आमचं वॉक मंजीन् नदीकड. आमी तेवडदणीत संध्याकाळी झालं तर घागर कांडुगुन कित्ती दूर होईल की तेवड दूर जाणं."

बोलीभाषेत इंग्रजी शब्दांचा वापर बराच होतो.तसंच तामिळ आणि क्वचित तेलगू शब्दही ऐकू येतात.

-उषा रानडे, (तंजावरी मराठी कोश लेखातून, पृष्ठ ५१५
तंजावर खंड सं. वसंत स. जोशी, प्रकाशक राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.)

## दीर्घकथा : मानवी मनोव्यापार आणि तदनुषंगिक कृती यांच्यातील नाट्य

विशिष्ट परिस्थितीतील व्यक्तींच्या संज्ञ-असंज्ञ मनोव्यापारांचे सूक्ष्म चित्रण करीत बाह्य परिस्थिती आणि आंतरिक अवस्था यांचा समतोल साधत बनहट्टींची कथारूप धारण करते. एका अर्थाने ती मूलभूत भावनांचा आविष्कार करणारी कथा (ए स्टोरी ऑफ बेसिक इन्स्टिंक्ट) म्हणता येईल. भीती, शारीर आकर्षण, जिजीविषा, सर्जनप्रवृत्ती, स्वार्थ, प्रेम, हेवा, क्रोध, अपराधी भावना यासारख्या मूलगामी भावनांनी त्यांची कथा घडविली आहे. परंपराप्रामाण्य, पुरुषप्रधानता, धार्मिक वृत्ती, प्रामाणिकपणा, निष्ठा इ. मूल्यांची अभिव्यक्ती

वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या आचारविचारांतून घडते.दीर्घकथेचा फॉर्म त्यांना घडवावा लागला नाही. तो सिद्ध झाला होता. त्यात त्यांनी क्रांतिकारक बदल घडवून आणले नाहीत, तरी त्यांनी कोणताही रूढ साचा स्वीकारलेला नाही. त्यांच्यावर कोणाच्याही लेखनाचा प्रभाव नाही. त्यांच्या कथा पृथगात्म आहेत आणि त्यांनी निवडलेला मार्ग विलक्षण आहे. मानवी मनोव्यापार आणि तदनुषंगिक कृती यांच्यातील नाट्यावर त्यांनी आपली कथी उभी केली आहे. आणि मराठीत तरी ती अ-पूर्व, अ-सामान्य आहे.

–विलास खोले (बनहट्टींच्या निवडक दीर्घकथा प्रस्तावना, प्रकाशक – प्रतिमा प्रकाशन, पुणे)

**व्यापक व व्यक्ती-संस्था-निरपेक्ष सरकारी सांस्कृतिक धोरण आवश्यक आहे**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या सांस्कृतिक धोरणात सुसूत्रता नाही. पक्के व विचारपूर्वक ठरवलेले निकष नाहीत. पण त्यामुळे काय होते, तर ज्यांना राजकारण्यांप्रमाणे पक्ष बदलण्याची क्रिया पटकन जमते आणि कोणत्याही सत्ताधाऱ्यांशी चटकन जमवून घेता येते, त्या साहित्यिक, कलावंत, क्रीडापटू यांचे फावते. अशा स्व-कल्याणेच्छूंचे कितीही व्यक्तिगत कल्याण झाले तरी अंतिमतः समाजाचा तो सांस्कृतिक पराभवच ठरतो. आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना व संस्थांना आर्थिक मदत करणे, सरकारी नियमांना बगल देऊन अनुदान वाटणे, याने राज्याचा सांस्कृतिक विकास साधणार नाही. त्यासाठी पक्षनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष, संस्थानिरपेक्ष, प्रवृत्तीनिरपेक्ष असे व्यापक सांस्कृतिक धोरण राज्य सरकारकडून आखले गेले पाहिजे.

राज्य सरकारकडून व्यापक सांस्कृतिक नकाशा तयार होणे गरजेचे आहे. तसे झाले नाही तर मात्र अनुदान-संस्कृतीच्या ओझ्याखाली सरकारी प्रयत्नांची अपूर्णता जाणवत राहणार. काही मतलबी साहित्यिक, कलावंत, क्रीडापटू नैतिक वा वाचिक पाठिंब्याच्या बदल्यात भरपूर मोबदला सरकारकडून उकळणार. समाजाची सांस्कृतिक पातळी मात्र दिवसेंदिवस खालावत जाणार आणि तो असहिष्णुतेचा बळी ठरून हिंसात्मक मार्गाने जाणार. सांस्कृतिक खात्याच्या मंत्र्याने मग संस्कृती-रक्षणाचा वा विकासाचा कितीही आव आणला, तरी त्याच्या बोलण्यातला फोलपणाच प्रत्येक वेळी ऐकणाऱ्यांच्या ध्यानात येत राहणार.

–अरुण टिकेकर, (लोकरंग, लोकसत्ता, ३१ मे १९९८)


*विविध विषयावरील उत्तम मराठी पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या.*

**आयडियल पुस्तक त्रिवेणी**

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६




## मे अंकातील स्पर्धेचा निकाल

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | फू | ल | न | दे | वी | ■ | ज |
| ना | ■ | क्ष्म | ■ | व | र | ■ | यं |
| प्र | | वी | ■ | या | ■ | खो | त |
| भू | ■ | लों | ■ | नी | ■ | ■ | ना |
| ■ | ब | ढे | ■ | ■ | शि | का | र |
| भै | ■ | ■ | ■ | ■ | तु | ■ | ळी |
| र | म | ल | खु | णा | ■ | ■ | क |
| प्पा | ■ | ज्जा | ■ | ■ | बि | ढा | र |

**शब्दकोडे क्र. ४ चे उत्तर**

या स्पर्धेत पुढील भाग्यवंत उमेदवार बक्षीसपात्र ठरले आहेत त्यांनी प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके कळवावी.

१) **सोनल पं. इंगोले,** दर्यापूर, जि. अमरावती-४४४८०३.

२) **संजय देवगोंडा पाटील,** ता. करवीर, जि. कोल्हापूर-४१६११९.


**पालकांसाठी खुषखबर !**

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण मे महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.*

## –: स्पर्धेतील यशस्वी मुलांची पत्रे :–

**मे ९८च्या अंकातील 'पत्र पाठवा, बक्षीस मिळवा' या स्पर्धेत खालील मुलांची पत्रे यशस्वी ठरली आहेत. त्यांना लवकरच छान छान पुस्तके बक्षीस म्हणून पाठवत आहोत.**

### प्रतापगडावर फास्टर फेणे

या सुट्टीत मी प्रतापगडावर फास्टर फेणे हे पुस्तक वाचले. ते मला खूप आवडले. हे पुस्तक भा. रा. भागवत यांनी लिहिले आहे.

बनेश हे फास्टर फेणेचे खरे नाव. तो पुण्याजवळील फुरसुंगी येथे राहणारा. फास्टर फेणे, त्याचे वर्गमित्र व त्यांचे गुरुजी प्रतापगडावर सहलीला गेले होते. तेथे त्यांच्यावर एक संकट आले. बन्याच्या मित्राला एका ढोंगी साधूने पळवले व एका गुहेत डांबून ठेवले. बन्याने स्वत:चा जीव धोक्यात घालून आपल्या मित्राची सुटका केली. एवढेच नव्हे तर त्याने ढोंगी साधूचे ढोंग उघडकीस आणले व खजिन्याचा शोध लावला.

अशाप्रकारे भा. रा. भागवत यांनी फास्टर फेणेच्या साहसाचे वर्णन केले आहे. म्हणून हे पुस्तक मला आवडले.

–क्षितिज उदय लिमये, इ. ५वी, लोकमान्यनगर, पुणे - ३०.

### किमयागार

या सुट्टीत मी सुधाकर भालेराव यांनी लिहिलेले, वोरा अँड कंपनीने प्रकाशित केलेले केवळ ५० पानी 'किमयागार' हे पुस्तक वाचले. किमयागार म्हणजे आश्चर्यकारक अशक्य गोष्ट करून दाखविणारा. हा किमयागार आहे थोर शास्त्रज्ञ, 'थॉमस अल्वा एडिसन'.

या पुस्तकात लेखकाने एडिसनचे चरित्र मुद्देसूद आणि सोप्या भाषेत लिहिले आहे. यात एडिसनच्या प्रत्येक गुणावर एक-एक मोठा परिच्छेद लिहिला आहे. त्यामुळे ते गुण मनावर ठसतात. लेखकाने एडिसनने लावलेल्या शोधांची तांत्रिक ऊहापोह न करता त्यामागचा त्याचा ध्यास, कष्ट यांवर जोर दिला आहे. लेखकाने एडिसनला आलेले अनुभवही लिहिले आहेत. त्यातून बरेच काही शिकण्यासारखे आहे. स्वत: एडिसनचेच आयुष्य इतके अद्‌भूत व आश्चर्यकारक आहे की ते खूपच आवडण्यासारखे आहे. म्हणून मला हे पुस्तक आवडले.

–कुतूहल उदय लिमये, इ. ७वी, लोकमान्यनगर, पुणे - ३०.




गदिमांचे 'गीतरामायण' हा मी आजतागायत वाचलेला एकमात्र काव्यसंग्रह. गीतरामायणातील काव्यात असणारी गेयता मला भावली. गदिमांनी उपमा व रूपक अलकारांचा नितांत सुंदर असा मेळ घातला आहे.

कादंबरी हा लेखनप्रकार मनास आवडला तो ''बनगरवाडी'च्या वाचनाने! धनगरांच्या वस्तीत शिक्षणप्रसार करण्यासाठी आलेल्या कोवळ्या वयातील लेखकाच्या वाट्यास आलेल्या ''कडू व गोड'' आठवणीचे प्रत्यक्षदर्शी वर्णन असलेल्या बनगरवाडीने मराठी साहित्य विश्वातील कादंबरीचे दालन माझ्यासाठी खुले केले. जयवंत दळवी यांची मिस्कील कादंबरी ''सारे प्रवासी घडीचे'' व भालचंद्र नेमाडे याची प्रक्षोभक 'कोसला' ही कादंबरी वाचली.

शंकर पाटील यांच्या 'शांकरकथा', द. मा. मिरासजारांची 'भोकरवाडीची चावडी' तर व्यंकटेश माडगूळकरांचा 'बाजार' हे कथासंग्रह वाचले. आत्मचरित्राला योग्य पर्याय असणाऱ्या जयवंत दळवी यांचे 'आत्मचरित्राऐवजी' व 'परममित्र' ही पुस्तके आवडली. कठीण बाल्यावस्थेतून आपले जीवन सुसंपन्न करणाऱ्या व्यंकटेश माडगूळकरांचे 'प्रवास : एका लेखकाचा' हे चरित्र वाचले. त्यातील पुस्तक निर्मितीच्या कथा रंजक वाटल्या.

निखळ विनोदाला कारुण्याची झालर असलेल्या पु. ल. देशपांडे या सच्च्या सारस्वताची 'अपूर्वाई', 'पूर्वरंग' ही प्रवासवर्णने, 'व्यक्ति आणि वल्ली' हे व्यक्तिचित्र वाचले.

–प्रसाद रामचंद्र ठाकूर, नाबरवाडी, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग-४१६५२०.



*काय म्हणतोस काय? आपल्या राजकीय नेत्यांपेक्षा?*

# पुस्तकांची नावे ओळखा, बक्षीस मिळवा!

ग्रंथजगत
जुलै स्पर्धा क्र.१

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| झा | मा | हा | थ | ना | र | अ | डे | य | आ |
| | झी | | | च | आ | ला | व्हा | हे | का |
| ध | क | स्मृ | सा | ग | दो | | म | | शा |
| बं | हा | ति | थ | घु | र | नो | ता | वी | शी |
| तु | णी | चि | सं | मा | ह | | चि | दे | ज |
| अ | | त्रे | ग | र | | | वे | न | ड |
| ध | | धु | त | भा | व | फु | ले | ल | ले |
| बं | | री | ळ | | रा | स | फु | फु | ना |
| हे | आ | ले | व | पा | न | रु | भ | मी | ते |
| का | ऐ | ते | ग | सां | टी | नी | सि | वा | सु |

रचनाकार : मनोहर बांदेकर

वरील चौकानात चौकोनात १९ स्त्री लेखिकांच्या चरित्र-आत्मचरित्रात्मक पुस्तकांची नावे आहेत. बरोबर उत्तरे दि. **२० ऑगस्ट १९९८** पर्यंत पाठवा. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव, पुणे-४११०३०.


'साक्षात ईश्वरच एव्हरेस्ट-स्वरूप दर्शन देतो आहे. या एव्हरेस्टपेक्षा वेगळा असणार आहे का तो? निश्चितच नाही!" एव्हरेस्टच्या पायथ्याशी असलेल्या बेस-कॅम्पपर्यंत आणि पुन्हा परत अशा ट्रेकिंगमधल्या अनुभवांचे रोमांचक वर्णन

**हिमकोंदणातील हिरा** — **सूर्यकांत कुलकर्णी**

मूळ किंमत : **८० रुपये** ■ सवलतीत : **६५ रुपये**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६,सदाशिव पेठ पुणे. ✆ ४७६९२४
**मेहता बुक सेलर्स,** भाऊसिंगजी रोड,कोल्हापूर. ✆ ५२२३०४




# वाचकांचा प्रतिसाद

जूनच्या ग्रंथजगतमध्ये 'साहित्यप्रेमींची गप्पामंडळे' या संपादकीयात आपण फार चांगला विचार मांडला आहे.

आपल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अशी माहिती कोणी दिल्यास ती आपण नाव-गाव-पत्त्यासह जरूर ग्रंथजगत मध्ये प्रकाशित करावी. आपण म्हणता त्याप्रमाणे या माहितीचा साहित्य प्रेमींमध्ये सौहार्द निर्माण होण्यासाठी नक्कीच खूप उपयोग होईल व परस्पर संपर्काचं एक नवं साधन या उपक्रमाद्वारे उपलब्ध होईल.

***- लक्ष्मण लोंढे, प्रभादेवी, मुंबई***

आपले सर्वच अंक उत्कृष्ट व वाचनीय असतात. बालवाचकात पुस्तकांविषयी आवड निर्माण व्हावी व त्यांना पुस्तकांचा परिचय करुण देण्यासाठी आपण जो बाल साहित्यावर भर देणारा मे ९८चा अंक काढला तो विशेष आवडला. तो लहान मुलांना व पालकांना पुस्तके निवडण्यासाठी नक्कीच मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल.

***- दिनेश आर. कापसे, यवतमाळ***

जूनचा अंक आवडला. ग्रंथजगतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांची माहिती मी वाचते. सर्व पुस्तके मन:पूर्वक वाचण्याची इच्छा होते. प्रत्येक पुस्तक विकत घेणे (निम्म्या किंमतीत असून सुद्धा) मला अशक्य आहे. मला वाचनाची अतिशय अवड आहे. आपण आपल्या सर्व पुस्तकांची छोटीशी लायब्ररी काढावी. पुस्तकाच्या किंमतीचे डिपॉझिट घ्यावे. शिवाय वर्गणी घ्यावी. तरच इतकी चांगली पुस्तकें मला आणि माझ्यासारख्या अनेक वाचकप्रेमींना या पुस्तकांच्या वाचनाचा लाभ घेता येईल.

***- प्रतिभा काळे, पाषाण रस्ता, बावधन***

## वाचकांना आवाहन

**मेहता मराठी ग्रंथजगत**चे अंक फक्त सभासदांनाच पाठविले जातील. तरी वर्गणीदारांनी व इच्छुक वाचकांनी नवीन वर्षाची वर्गणी (५० रुपये व भेट पुस्तकाचे पोस्टेज १५ रुपये) मनीऑर्डरद्वारा त्वरित पाठवावी.

# १९९८ सालातील वैविध्यपूर्ण वाचनीय पुस्तके

| | |
|---|---|
| रोदँ | शान्ताराम पारपिल्लेवार |
| चितेवरच्या कळ्या | वसंत गायकवाड |
| इलाटाज डायरी | ज्ञानदा नाईक |
| डिस्क्लोजर | अनु. माधव कर्वे |
| एकदाच अशी रात्र येते | अनु. रॉय किणीकर |
| चौघीजणी | अनु. शान्ता ज. शेळके |
| नॉट अ पेनी मोअर नॉट अ पेनी लेस | अनु. अंजनी नरवणे |
| मूल | संजोग विरकर |
| खाना-खजाना | अंजनी नरवणे |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक | अनु. आशा परुळेकर |
| शेलका साज | शिवाजी सावंत |
| आनंदाचे अंतरंग : मदर तेरेसा | अनु. फ्रान्सिस दिब्रिटो |
| निमित्तानिमित्ताने : राजीव गांधी | अनु. शान्ता शेळके |
| बोफोर्स | अनु. माधव मोर्डेकर |
| कथा स्वातंत्र्यलढ्याच्या | अनु. माधव कर्वे |
| सातव्या मुलीची सातवी मुलगी | अशोक पाटोळे |
| कमान | विजया राजाध्यक्ष |
| मायामृग | अनु. उमा कुलकर्णी |
| एकच पेला शिवाम्बुचा | डॉ. शशी पाटील |
| व्यवसाय मार्गदर्शक | अनु. मीना किणीकर |
| कर्करोग असाध्य नाही | अनु. राम दातार |
| हिरवे जनुक | अनु. प्रमोद जोगळेकर |
| साहित्यवेध | के. रं. शिरवाडकर |




# T Book Club

## ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

प्रथम २० रु. भरून T Book Club चे सभासद व्हा आणि गाजलेल्या इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत मिळवा.

या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. आपण सभासद झाल्यास, ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल.

आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.

T Book Club योजनेअंतर्गत यापूर्वी प्रकाशित झालेली पुस्तकेही आपण ६ पुस्तकांच्या प्रत्येक संचासाठी प्रत्येकी २०रु. भरून निम्म्या किंमतीत मिळवू शकता.

ही सर्वच पुस्तके इंग्रजीतील गाजलेल्या साहित्यकृतींचे उत्तम अनुवाद आहेत.

आजच २० रु. मनीऑर्डरने पाठवा व T Book Club चे सभासद व्हा.

**T Book Club - 8 ची सभासद नोंदणी चालू आहे.**


### आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| मध्यस्थ | फ्रेडरिक फोरसीथ | लीना सोहोनी |
| वाईल्ड कार्ड | रेमंड हॉकी/ रॉजर बिंग हॅम | अरुण मांडे |
| लव्ह स्टोरी | एरिक सेगल | अनिल इनामदार |
| सिटाडेल | ए. जि. क्रोनिन | मंगला निगुडकर |
| नो कम बॅक्स | फ्रेडरिक फोरसीथ | विजय देवधर |
| हे बंध वात्सल्याचे | हेरॉल्ड रॉबिन्स | योगिनी वेंगुर्लेकर |
| तू असा जवळी रहा | हेरॉल्ड रॉबिन्स | पद्मा अभ्यंकर |
| मुखवटे | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| पाषाण | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| नाईट | इली वायझेल | आशा कर्दळे |
| द मिरर क्रॅकड | ॲगाथा ख्रिस्ती | श्रीनिवास गुळवणी |
| हंट द मॅन डाऊन | विल्यम ह्यूमन | अरुण डावखरे |
| ट्रिनिटीज चाईल्ड | विल्यम प्राक्नो | अनिल काळे |
| साक्षी | सरला बार्नबस | स. वा. मुळे |
| सिटी ऑफ जॉय | डॉमिनिक लॅपिए | अनिल कुलकर्णी |
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी | लीना सोहोनी |
| द टर्मिनल मॅन | मायकेल क्रिश्टन | अरुण मांडे |

## आमचे काही वैशिष्ट्यपूर्ण अनुवाद

| | मूळ लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| पर्व | एस. एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| परिशोध | एस. एल. भैरप्पा | सौ. उमा कुलकर्णी |
| चिदंबर रहस्य | के.पी. पूर्णचंद्र तेजस्वी | सौ. उमा कुलकर्णी |
| वात्सल्यपथ | व्यासराय बल्लाळ | मीरा शिराली |
| वाट दीर्घ मौनाची | शशी देशपांडे | सानिया |
| घर | टी. जी. जाधव | अनुपमा डंबळ |
| लज्जा | तसलिमा नासरिन | सौ. लीना सोहोनी |
| फेरा | तसलिमा नासरिन | सौ. मृणालिनी गडकरी |
| अरुणा | चलम् | अरविंद कोरबा |
| सागरतीरी | ध्रुव भट | अंजली नरवणे |
| चीपर बाय द डझन | फ्रँक बंकर गिलब्रथ | मंगला निगुडकर |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक | ॲन फ्रँक | मंगला निगुडकर |
| अ टेल ऑफ टू सिटीज् | चार्लस् डिकन्स | विद्याधर पुंडलिक |
| मृत्यूच्या सान्निध्यात | लाओल बर्टन बंकर | मधुकर प्रधान |
| **कथा** | | |
| एकटी | मन्नू भंडारी | शुभा चिटणीस |
| मंटोच्या कथा | सआदत हसन मंटो | श्रीपाद जोशी |
| आई एका पक्ष्याची | सुनील गंगोपाध्याय | तारा पंडित |
| गुडनाईट डॅडी | चंद्रकांत बक्षी | गिरीश दाबके |
| राजा निरबंसिया | कमलेश्वर | नीलिमा साने |
| मरणगंध | — | विद्याधर पुंडलिक |
| **आत्मकथने/चरित्रे** | | |
| द प्लेन ट्रुथ | एन.के. सिंग | माधव मोर्डेकर |
| स्टेफी | स्यू हेडी | आशा कर्दळे |
| मी, फुलनदेवी | मारी तेरेज क्यूनी | प्रमोद जोगळेकर |
| व्यथित मनानं सांगावसं वाटतं की... | टी.एन. शेषन | भारती पांडे |
| आय डेअर—किरण बेदी | परमेश डंगवाल | आशा कर्दळे |
| सत्यजित राय यांचे विश्व | विद्युत सरकार | चारुलता पाटील |
| माझ्या आयुष्यातील स्त्रिया आणि पुरुष | खुशवंतसिंग | लीना सोहोनी |
| राजीव गांधींच्या सहवासात | राम प्रधान | माधव मोर्डेकर |

जुलै १९९८

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ वर्ष दुसरे
◆ अंक सातवा

## अनुक्रम

संपादकीय ---------- २
साहित्यवार्ता ---------- ५
श्रद्धांजली ---------- १२
पुस्तकपरिचय ---------- १४
एक आगळी वेगळी स्पर्धा ---------- ३५
फुले आणि काटे ---------- ३६
स्पर्धा, निकाल ---------- ४१
शब्दकोडे ---------- ४४
वाचकांचा प्रतिसाद ---------- ४५

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
फोन : ४७६९२४

❑ कार्यकारी संपादक
शंकर सारडा
❑ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर
❑ मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

❑ अंकाची किंमत ५ रु.
वार्षिक वर्गणी ५० रु.
❑ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
❑ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

*संपादक-मुद्रक-प्रकाशक :* **सुनील मेहता**, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.
*अक्षरजुळणी :* **मेहता पब्लिशिंग हाऊस**, १२१६, सदाशिव, पुणे - ३०. फॅक्स : २१२-४७५४६२

*या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## प्रथितयश लेखकांची संग्राह्य पुस्तके

**रणजित देसाई**

स्वामी
राधेय
पावनखिंड
लक्ष्यवेध
स्नेहधारा
शेकरा

---

**वि. स. वाळिंबे**

वॉर्सा ते हिरोशिमा
वुई द नेशन (अनु.)
एडविना आणि नेहरु (अनु.)

---

**आनंद यादव**

नांगरणी
घरभिंती
काचवेल
नटरंग
माळावरची मैना
मराठी लघुनिबंधाचा इतिहास
आत्मचरित्र मिमांसा

## प्रथितयश लेखकांची संग्राह्य पुस्तके

**वि. स. खांडेकर**
वनदेवता (रूपककथा)
मुरली
रागिणी

**व. पु. काळे**
आपण सारे अर्जुन
मोडेन पण वाकणार नाही
वलय

**शांता शेळके**
लेखक आणि लेखने
पावसाआधीचा पाऊस
सांगावेसे वाटले म्हणून..
आंधळी (अनु.)
चौघीजणी (अनु.)
निमित्तानिमित्ताने (अनु.)
पूर्वसंध्या (कविता)

**सदानंद देशमुख**
लचांड
उठावण
महालूट

**निरंजन घाटे**
एकविसावं शतक
हवाई युद्ध
यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्ता
ज्ञानदीप
वसुंधरा

**माधवी देसाई**
मंजिरी
कथा सावलीची
परिचय (अनु.)
धुमारे

**सुरेशचंद्र नाडकर्णी**
पृथ्वीवर माणूस उपराच
अज्ञाताचे विज्ञान

**मंगला निगुडकर**
पराजिता
डायरी ऑफ ॲन फ्रॅन्क (अनु.)
चीपर बाय दि डझन (अनु.)

**दया पवार**
विटाळ
चावडी
पासंग

**र. वा. दिघे**
पड रे पाण्या (कादंबरी)
पाणकळा (कादंबरी)
कार्तिकी (कादंबरी)
गानलुब्धा मृगनयना (कादंबरी)

**वसंत पेणे**
सेंट्रल बस स्टेशन (कादंबरी)
पहिला अध्याय (कादंबरी)
पिता पुत्र (कथा)

# आमची वैविध्यपूर्ण प्रकाशने

| | |
|---|---|
| काचवेल | आनंद यादव |
| करार एका ताऱ्याशी (कुसुमाग्रज) | संपा. वसंत पाटील |
| एकविसावं शतक | निरंजन घाटे |
| पावसाआधीचा पाऊस | शान्ता ज. शेळके |
| संचित | मनोहर शहाणे |
| प्रवाहातील पक्षी | निलु गव्हाणकर |
| शेलका साज | शिवाजी सावंत |
| अस्वस्थ दशकाची डायरी (न.आ.) | अविनाश धर्माधिकारी |
| गॉरगोनाईज | अनिल किणीकर |
| साहित्यवेध | के. रं. शिरवाडकर |
| धुके | वि. स. खांडेकर |
| प्रसाद | वि. स. खांडेकर |
| पहिले पान | वि. स. खांडेकर |

## उत्कृष्ट अनुवाद

| | |
|---|---|
| चौघीजणी | अनु. शान्ता ज. शेळके |
| मी, फूलनदेवी | अनु. प्रमोद जोगळेकर |
| अनुभव : बासू भट्टाचार्य | (शब्दांकन) अशोक राणे |
| द प्लेन ट्रुथ | अनु. माधव मोर्डेकर |
| बोफोर्स | अनु. माधव मोर्डेकर |
| फ्रीडम ॲट मिडनाईट | अनु. माधव मोर्डेकर |
| परिचय | अनु. माधवी देसाई |
| डोंगराएवढा (न.आ.) | अनु. उमा कुलकर्णी |

***T Book Club* चे सभासद व्हा व**

**अनुवादीत पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.**